# चैतन्य लहरी

अंक : ३ व ४ सन १९९८ मार्च, एप्रिल



सर्व मानव जातीच्या उद्धारासाठी, सर्व मानव जातीचे परिवर्तन करण्यासाठी, सर्व जगामध्ये परमेश्वराचे राज्य आणण्यासाठी, आपल्याला साऱ्या जगाचे सहस्त्रार उघडायचे आहे; हेच कार्य आपल्याला करायचे आहे.

## श्री माताजी निर्मलादेवी

सहस्त्रार पूजा कबेला ४ मे १९९७

# अनुक्रमणिका


| नाव | पान क्र. |
|---|---|
| १) सहस्त्रार पुजा<br>कबेला ४ मे १९९७ | ३ |
| २) गुरूपूजा<br>१९९७ | ८ |
| ३) महकाली पुजा<br>फ्रान्स १९९० | १४ |
| ४) ध्यानाची आवश्यकता<br>दिल्ली आश्रम १९९१ | १९ |
| ५) भारतीय संस्कृती आणि सभ्यता | २१ |
| ६) उत्थान पथ पर २१ महत्वपूर्व कदम | २ |

## उत्थान पथ पर २१ महत्त्वपूर्ण कदम

१. हमे सदा याद रखना है कि श्री माताजी कौन हैं ।
२. हमें प्रतिदिन ध्यान धारणा अवश्य करनी हैं ।
३. हमें दूसरों की आलोचना कतई नहीं करनी हैं ।
४. नियमित जूता क्रिया, पानी पैर, नाक में घी-कपूर तथा लहरियों का आदान प्रदान कीजिए ।
५. आत्मा के विरोध में न हमें कुछ करना चाहिए और न कुछ कहना ।
६. हमें नियमित रूप से श्री माताजी के टेप सुननें तथा देखने चाहिए ।
७. हमारा ज्ञान सर्वोत्तम है, यह दुर्विचार आपमे भरने की आज्ञा अपने अहं को मत दीजिए यह भी नहीं कि सभी लोग हमारे जैसे बनें और हमसा ही आचरण करें ।
८. सुनहरे नियम का पालन जी-जान से करें । (अपने पड़ोसी को भी वैसे ही प्रेम करें जैसे स्वयं को करते है)
९. मानसा-वाचा, कर्मणा, हमें कट्टर नही होना हैं ।
१०. पारस्परिक संबंध विकसित करने के लिए हमें कार्यरत रहना चाहिए मर्यादाओं के प्रति हमें जागरूक रहना चाहिए ।
११. आश्रम में हमें समस्याएँ खड़ी नहीं करनी चाहिए आश्रम आनंद तथा शांति का स्थान होना चाहिए ।
१२. अपने अंतस की परिचित समस्याओ को सुलझाने के लिए गंभीरता से प्रयत्नशील होना ही चाहिए ।
१३. सुधारे जाने पर प्रतिक्रिया नहीं करनी ।
१४. हमें सप्ताह में कम-से-कम एक बार जनसामुहिक कार्यक्रम में भाग लेना आवश्यक हैं ।
१५. अपनी त्रुटियों पर पर्दा डालने के लिए हमें बहाने नहीं सोचने चाहिए ।
१६. हमें निर्णायक बनने से बचना चाहिए ।
१७. हमें व्यर्थ गप्पे नहीं हाकनी चाहिए ।
१८. अपने समय और साधनों सहित हमें उदार होना चाहिए ।
१९. चैतन्य लहरियों के सम्मुख बौद्धिक धारणाओं को महत्त्व न दें ।
२०. हमें सदा याद रखना चाहिए कि हम श्री माताजी के घर में रहते हैं ।
२१. निजी कार्यो को सहज गतिविधियों के सम्मुख प्राथमिकता नहीं दी जानी चाहिए ।

— जय श्री माताजी

# सहस्त्रार-पूजा

## प.पू. श्री माताजी निर्मला देवींचे भाषण (सारांश)

कबेला : ४ मे १९९७

आज आपण सहस्त्रार पूजेसाठी इथे जमलो आहोत. कुण्डलिनीच्या सूक्ष्म कार्यपद्धतीमध्ये सहस्त्राराचे महत्त्व तुम्ही जाणताच. आजचा हा दिवस महान आहे; १९७० मध्ये याच दिवशी सहस्त्रार उघडले गेले; पण या घटनेमधून आपण काय मिळवले हे आपल्याला लक्षात घ्यायला हवे. कुण्डलिनीचे जागरण झाल्यावर प्रथम ती भवसागरात येते. हे तुमच्यामधील धर्माचे स्थान आहे आणि इथेच नाभीचक्रामध्ये तुमच्यामधील धर्म प्रस्थापित होतो. हाच तुमचा मुळातला शुद्ध विश्वधर्म. एवढं झाल्यावरही कधी कधी तुम्हाला आजूबाजूच्या समाजापासून दूर रहावे असे वाटू लागते, ते लोक धार्मिक नाहीत असे वाटू लागते आणि अशा अधर्मी लोकांच्या संगतीत आपल्याला त्रास होईल असेही वाटते. 'सहज' सोडून इतर काही नको, सहजामध्येच वेळ घालवावा, प्रोग्राम करावे, आपल्या सहज-जीवनाची काळजी घ्यावी अशी धारणा होते. तुम्हाला माहीत आहेच की आपले स्वाधिष्ठान चक्र नाभीचक्राभोवती फिरत असते आणि याच चक्रातून मेंदूला शक्ति-पुरवठा होतो. धर्म प्रस्थापित झाल्यावर कुण्डलिनी शक्ती अधिक जोराने सहस्त्रारांत येऊ लागते आणि स्वाधिष्ठान चक्रामधून ही धर्मशक्ती प्रवाही बनते व सहस्त्रारापर्यंत पोचते. तोपर्यंत आपण खऱ्या अर्थानि सहजयोगी झालेलो नसतो, सहज-जीवनाबद्दल विचित्र समजूती करून घेतल्यामुळे असहजी लोकांबरोबर राहूच शकत नाही आणि अशा लोकांबरोबर संबंध जुळवत नाही. आता जे खराब लोक आहेत, सहजाच्या विरोधात आहेत व सहजबद्दल विरोधी मते मांडतात अशा लोकांपासून दूर रहायला हरकत नाही. पण जे सत्याच्या शोधांत आहेत त्यांच्याबद्दल सहानुभूती ठेवलीच पाहिजे. वर सांगितल्याप्रमाणे धर्मशक्ती सहस्त्रारांत प्रस्थापित झाली की तुम्ही धर्माच्या पलिकडे जाता, म्हणजेच धर्मातील बनता.

नंतर धर्म आपल्या जीवनाचा एक अंगच बनून जातो आणि त्या धर्मापासून आपण दूर राहूच शकत नाही. जीवनातून सहज-धर्माचा सतत आविष्कार होत राहिल्यामुळे कर्मकाण्डाची जरूर रहात नाही. अ-सहजींबरोबर बसण्या-उठण्याची व आपल्या चैतन्यलहरी त्यामुळे बिघडण्याची भिती वा शंका उरत नाही; कुणाकडूनही तुमच्यावर पकड येणार नाही, कोणच्याही विरोधी शक्ती तुमच्यावर प्रभाव पाडणार नाहीत. कोणीही तुमचे काहीही बिघडवू शकणार नाही. याच स्थितीला मी तुमची श्रद्धा पूर्णावस्थेला आली आहे असे म्हणते; या स्थितीमध्ये सहस्त्रार इतके प्रकाशित होते की तुम्ही एक चालता-बोलता धर्म बनून जाता. येशू ख्रिस्त हे या स्थितीचे उदाहरण आहेत. त्यांनी एकदा लोक एका वेश्येवर दगड मारत असल्याचे पाहिले. तिच्याशी त्यांना काहीच कर्तव्य नव्हते कारण ते तिच्या पूर्णपणे उलट (म्हणजे पूर्ण शुद्ध) होते. तिला लोक दगड मारत असल्याचे पाहून हातात दगड घेऊन ते लोकांना म्हणाले, "जो कुणी कधी पाप केले नाही असा असेल त्याने मला दगड मारावा." हे ऐकून सारे लोक सुन्न झाले. याला कारण म्हणजे ख्रिस्त स्वतः पूर्णपणे सत्याबरोबर होते, त्यांच्या बोलण्याला सत्याचा आधार होता. सहस्त्रारमध्ये धर्म प्रस्थापित झाला म्हणजे तुम्ही पण असेच बनता व सत्याचे आधार होता. धर्म आणि सत्य यांच्यामध्ये थोडा सूक्ष्म फरक आहे. धार्मिक मनुष्य कधीकधी धर्माचा अतिरेक करतो आणि डावीकडे वा उजवीकडे जातो; स्वतःला कुणीतरी विशेष, श्रेष्ठ समजू लागतो आणि इतर लोकांना वाचवण्याची, त्यांना मार्गावर आणण्याची त्याला फिकीर वाटेनाशी होते. मी काही सहजयोगी असेही बघितलेत जे स्वतःहून नवीनच काहीतरी सहजयोगामध्ये चालू करतात. असे लोक धर्मामध्ये खऱ्या अर्थाने प्रस्थापित नसतात म्हणून लोकांना स्वतःचे असे काहीतरी सांगत सुटतात. पण एकदा सत्य तुमच्यामध्ये प्रकाशित झाले की तुम्हाला सहजयोगाच्या पद्धती पाळण्याचीही जरूर रहात नाही; कारण तुम्ही धर्मच जगत असता आणि सत्यावर तुमचे जीवन आधिष्ठित असते. सत्य हे धर्माहून मोठे असते. ज्याने सत्य खरोखर जाणले आहे त्याला सहजयोगाबद्दलच्या किंवा धर्माबद्दलच्या चित्र-विचित्र कल्पनांची, मतांची फिकीर नसते; अमुक-अमुक गोष्ट सहजाप्रमाणे आहे की नाही याची पण त्याला काळजी नसते; कारण तो या सर्वांच्या पलीकडे गेलेला असतो. एका अर्थाने विश्वव्यापी सत्य त्याच्यामध्येच असल्याचे तो जाणतो. सगळीकडे त्या सत्याचा आविष्कार त्याला दिसतो. एवढेच नव्हे तर तो ते जाणतो आणि स्वतःला त्या सत्यामध्येच असल्याचे त्याला समजते. याचा अर्थ एवढाच की धर्म सत्यामध्ये परावर्तित होतो तुमच्यामध्येही ही सुंदर घटना घटित व्हायला हवी. तुम्ही नुसते धार्मिकच राहिलात तर अहंकार, पैसा इ. वासना सूक्ष्मपणे टिकून राहतात. काही लोक तर मला न विचारताही अयोग्य अशा गोष्टी करत राहतात आणि सहजयोगाला पोषक नसलेली कामे करत राहतात; त्यांच्यामध्ये नम्रता नसते. या सगळ्याचे कारण म्हणजे त्यांचा धर्म सत्यावर उभा राहिलेला नसतो.

सत्य हेच धर्माचे मूळ आहे आणि आपल्याला त्या मुळापर्यंत

जायचे आहे. जीवनाच्या वृक्षाची मुळे डोक्यामध्ये आहेत व फांद्या शरीरभर पसरलेल्या आहेत. सहस्त्रारामध्ये तुम्ही पूर्णपणे प्रस्थापित झालात की तुम्ही मुळांपर्यंत जाता. आपल्या सर्व कल्पनांचे, जाणीवांचे किंवा आजपर्यंतच्या सर्व स्वरूपांचे मूळ सहस्त्रारांत आहे आणि आता आपण धार्मिक बनलो आहोत. कुणी म्हणेल धर्म कशाला हवा आणि त्याचा काय फायदा? आजच्या जगात अधार्मिक लोकही ऐशआरामी जीवन जगत असताना दिसतात. वरवर पाहिले तर ते जीवनामध्ये सुखी आहेत, आनंदात जीवन उपभोगत आहेत आणि आपण मात्र धार्मिक असूनही जीवनातील सुखोपभोगांना पारखे झालो आहोत असे वाटेल. अशा स्थितीमध्ये सत्यावर आधारित नसलेल्या पण धर्मानुसार असलेल्या गोष्टींचे आपल्याला जास्त महत्त्व वाटते. सहजयोगी लोकही धार्मिक स्थितीला आल्यावरही कधी कधी कशा चुका करतात याची अनेक उदाहरणे मी सांगू शकेन. आता त्यांच्या वाईट सवयी सुटल्या. दारू-नशा इ. व्यसने सुटली, त्यांचे बोलणे-वागणे बदलले, नम्रता दिसायला लागली हे सर्व चांगले झाले पण हे सर्व सहज-धर्माप्रमाणे आहे याचे भान त्यांना सुटत नाही आणि हेच भान (Consciousness) सुटायला हवे.

सहस्त्रार प्रस्थापित झाल्यावर हे भान उरत नाही कारण त्या स्थितीमध्ये सत्य म्हणजे प्रेम व प्रेम म्हणजे सत्य एवढीच जाणीव उरते. कुण्डलिनी हृदय-चक्रावर पूर्णपणे आल्यावर हे घटित होते. हृदय-चक्राचे पीठ सहस्त्रारामध्ये आहे हे तुम्हाला माहित आहे. कुण्डलिनी हृदय-चक्र पार करुन सहस्त्रामध्ये आली की मेंदूमध्ये (सहस्त्रारामध्ये) सत्याचा प्रकाश येतो आणि हा प्रकाश प्रेम-स्वरूप असतो. सत्य आणि प्रेमरूप सत्य यांत सूक्ष्म असा फरक आहे. वरच्या गोष्टीमध्ये ख्रिस्तांना त्या वेश्येबद्दल प्रेम वाटल्यामुळे ते तिच्या मदतीला आले. ते पूर्णपणे सत्याबरोबर होतेच पण शिवाय त्यांच्या हृदयांत प्रेमाचा पान्हा फुटला होता. आणि ते अत्यंत शुद्ध प्रेम होते. असे शुद्ध प्रेम जेव्हा आपल्याला एखाद्या व्यक्तीबद्दल वाटू लागते तेव्हा सर्वकाही विरून त्या व्यक्तीबद्दलच्या आपल्या भावना पूर्णपणे बदलून जातात आणि सर्व प्रेममय व सुंदर बनून जाते. एरवी सत्य कटु असते, त्याला तोंड देणे दुःखदायक आहे असे जरी म्हटले जाते तरी ज्या सत्यामध्ये फक्त प्रेमच असते ते सत्य काटे नसलेल्या फुलासारखे होते. ज्याच्यामधून फक्त प्रेमच सतत वहात आहे आणि जो सत्याबरोबर आहे अशी व्यक्ती तुम्हाला बनायचे आहे.

प्रेमाचा आविष्कार कसा असतो याचे एक उदाहरण सांगते. समजा माझ्याकडे कुणीतरी एक सज्जन येऊन दुसऱ्या एका व्यक्तीबद्दल ती कशी खराब आहे अशी तक्रार करत राहिला तर त्या दोन्ही व्यक्तींबद्दल मला खूप करूणा वाटू लागते. मग मी जाणूनबुजून एक युक्ती करते आणि एका अर्थाने ते खरे पण असते आणि त्या व्यक्तीला सांगते, "मला तो भेटला होता तेव्हा तुमची तर तो खूप स्तुति करत होता" आणि सर्व बदलून गेले आणि त्यांचे आपसातले संबंध सुधारले. प्रेमाचे कार्य लोकांना एकत्र आणण्याचेच आहे, भाषापण तशीच असावी. आजपर्यंत तोडा-फोडीचे प्रकार चालत राहिल्यामुळे लोक एकमेकांपासून दुरावले पण आता प्रेमाच्या देवाण-घेवाणीतून लोकांची अंतःकरणे जोडली जातात. तुम्ही सर्वजण आता सामूहिक चेतनेमध्ये उतरले आहात. पण ही सामूहिकता जर वरवरची असली तर फार महान असे कार्य करू शकणार नाही. पण त्यामध्ये जर प्रेम अंतर्भूत असेल तरच या सामूहिक चेतनेचा आनंद परिपूर्ण असा होतो.

आज जगांत शांतीबद्दल बरेच बोलणे होत आहे, चर्चा होत आहेत; पण जाणीवेच्या उन्नत अशा स्तरावर आल्याशिवाय खरी शांती मिळत नसते; ही सामूहिक चेतना आहे पण त्यांमधेही प्रेम हेच मुलभूततत्व असले पाहिजे. आता जर्मनी किंवा ऑस्ट्रियाचे सहजयोगी इस्राईलला भेट देत आहेत हे फार चांगले घडत आहे. इस्राईलच्या लोकांना पूजेला बोलावल्याचे पाहून मला खूप आनंद झाला. तसेच इस्राईलचे योगी इजिप्तमध्ये जात आहेत. एकमेकांमध्ये तसेच नवीन लोकांमध्ये सुरू झालेली ही प्रेमाची देवाण-घेवाण ही फार महान गोष्ट आहे आणि त्यांतूनच सर्व जगामध्ये परिवर्तन होणार आहे. मनुष्यप्राण्यांमधले सर्व प्रश्न व समस्या द्वेषभावनेमधून निर्माण झाल्या आहेत. I hate ... हा शब्दप्रयोगच नाहीसा झाला पाहिजे. तुम्ही पापाचा तिरस्कार करा, सैतानी वृत्तीचा धिक्कार करा पण माणसांबद्दल कशाला द्वेष बाळगायचा? तसेच सत्तेच्या पाठी लागून त्यासाठी लोकांमध्ये दुराभाव निर्माण करण्याच्या प्रवृत्तीमुळे बरेच देश रसातळाला गेले. इंग्रजांनी आमच्या देशांत फूट पाडून सत्ता चालवली पण आता त्यांनाही त्याच समस्येला तोंड द्यावे लागत आहे. देशाचे तुकडे करून काय साध्य झाले? भारतापासून अलग झालेल्या सर्व देशांमसमोर आज गंभीर समस्याच आहेत. ही तुकडे पाडून वेगळे होण्याची लालसा स्वतःला सत्ताधीश बनवण्याच्या लोभापायी निर्माण झाली. त्यामध्ये बऱ्याच नेत्यांना ठार मारले गेले. द्वेषभावनेचा परिपाक असाच होत असतो. म्हणून द्वेषभावनेतून, सूड भावनेतून जगाचे प्रश्न कधीच सुटणार नाहीत आणि त्यांतून या भावना जास्तच बळकट होतील व समस्या अधिक गंभीर होतील.

सहजयोगातही गटबाजी करण्याचा विचार कुणी करता कामा नये. आता आम्हाला गंगेच्या जवळच एक जागा मिळाली आहे पण लोकांनी लगेच प्लॉटस् पाडून बंगले बांधण्याचे विचार सुरू केले. असं का? आपण सामूहिकतेने राहून आनंद मिळवणारे लोक असून वेगवेगळी घरे बांधण्याचा विचार कसा करू शकतो? आपल्यापैकी प्रत्येकाची काही गुप्त कारस्थाने आहेत काय? काही झाले तरी व्हायब्रेशन्सवर तुम्हाला सर्व समजतेच. सहजयोगामध्ये प्रायव्हेट (Private) असं काहीच नसते. प्रत्येकाला दुसऱ्यांबद्दल माहिती आहे. दुसऱ्यांच्या चक्रांची जाणीव आहे, दुसऱ्यांचे प्रॉब्लेम्स ठाऊक आहेत. प्रत्येक जण सगळ्यांना चांगले ओळखतो. मग Privacy ची गरज कुठे राहिली? मला वाटते माणसाचे मनच अशा कल्पना करण्याचे थांबत नाही.

तर नंतर त्यांनी वारसदाराचा मुद्दा काढला. मी म्हटले वारस

असावा पण तुमचा मुलगा सहजांत नसेल तर काय करणार? आपण कुठल्याही बाहेरच्या माणसाला आपल्याबरोबर राहू देणार नाही. या गोष्टी नियम वा कायदे करून काही सर्वजण सुखासमाधानांत एकत्र राहू शकत नाहीत तर सामूहिक शुद्ध चेतनेमध्ये व त्याच्या प्रेमामध्येच ते एकत्र राहू शकतील. आपल्याजवळ औपचारिक संघटना व अधिकारी हा प्रकार नाही. लीडर लोकही सारखे गंगा नदीच्या प्रवाहासारखे बदलत राहतात. एक प्रकारे तुम्ही सर्वजण भुसभुशीत वाळूच्या ढिगाऱ्यावर आहात आणि तुमची आई मायेचा खेळ करत असते हेहि तुम्ही जाणता. पण मला तर तुम्ही खडकासारखे खंबीरपणे उभे असलेले पाहायचे आहे आणि त्या खडकातूनही परमेश्वरी प्रेमशक्ती प्रवाहित होणार आहे आणि त्यांतून मिळणारा आनंद फार सुंदर आहे. भारतीय लोकांनाही स्वतंत्र बाथरूमची व्यवस्था हवी असते. म्हणजे इंग्रज लोक भारतीय झाले तर भारतीय लोक इंग्रज झाल्यासारखेच. सामूहिक जीवनामध्ये असले प्रकार चालत नाहीत. बाथरूमला जायचे याची तुम्हाला आठवणच होणार नाही; मला तर जाऊन आल्यावरही ते जाणवत नाही. असल्या विचारांना आपल्या मनात जागाच नाही. म्हणजे तुम्ही सर्व एका सागरासारखे व्हायचे आहे; सागरात लाटा आल्या की तुम्ही वर येणार, लाट विरली की खाली येणार अशा भावनेत एकत्र रहायची सवय तुम्हाला करायची आहे. हिमालयाच्या पायथ्याशी अशी एक सोसायटी व्हावी असे मला वाटते कारण हिमालय हे जगाचे सहस्त्रार आहे हे तुम्हाला माहीत आहे. सहस्त्रारपूजेच्या आधी हे व्हावे अशी माझी इच्छा होती आणि हिमालयाच्या आशीर्वादाने ते घडूनपण आले.

हिमालयपर्वत सहस्त्रारासारखा आहे आणि कुण्डलिनी तेथपर्यंत पोचल्यामुळे व्हायब्रेशन्स बाहेर येत आहेत आणि आकाशामध्ये तुम्हाला त्या दिसू शकतात. पण या हिमालयावर कोपिष्ट अशा शिवांचे राज्य आहे. म्हणून आपल्याला खूप खूप सतर्क व काळजीपूर्वक रहायला हवे. आपण काही सोंग घ्यायला लागलो, आपापसांत द्वेष बाळगून दुफळी माजवू लागलो, सहजाविरोधी कारवाया करू लागले तर हे संतापी शिव-महाराज आपल्या डोक्यावर आहेत एवढे समजले तरी पुरेसे आहे. तुम्ही भलते-सलते करू लागलात की त्यांचा क्रोध बाहेर पडेलच. तुम्ही कुठेही असा, शिवजी सगळीकडे बघत आहेत. महाराष्ट्रांत परळी-वैजनाथ इथे एक शिवलिंग आहे, तिथे काही मंडळींनी दुसराच एक समांतर सहजयोग चालू केला; गणेश उत्सवांत ते दारू पिण्यांत रंगून गेले आणि शिवांचा क्रोध भूकंपामधून बाहेर पडला. तिथल्या खऱ्या सहजयोग्यांना त्याचा त्रास झाला नाही व त्यांचे सहज-केंद्रही शाबूत राहिले. गेल्या वर्षी आपल्या सेमिनारमध्ये मोठी आग लागली होती पण कुठल्याच सहजयोग्याला इजा झाली नाही. तुम्हा सर्वांना संपूर्ण संरक्षण दिलेले आहे. तुम्हाला कशापासूनही भय नाही. चिंता नाही. पण हे संरक्षण आईच्या प्रेमातून मिळालेले असल्याने फार प्रभावशाली आहे, तुमची सदैव काळजी घेणारे व तुम्हाला मदत करणारे असे आहे. तुम्ही सर्वांनी पण इतर लोकांशी व सहजयोग्यांशी, एवढेच काय या धरणीमातेवरही असेच प्रेम करू शकाल अशी शक्ती वाढवा.

तुमची प्रेमशक्ती तुमचेच नव्हे तर इतरांचेही संरक्षण करू शकते. आल्यावर तुमचे लक्ष सतत जाऊं लागले तर ते हळूहळू स्थिर होऊं लागते. मला हे पाहिजे, ते पाहिजे, हे आवडत नाही, ते आवडते अशा सारख्या बाहेर धावणाऱ्या इच्छा सुटून जातात. तसला काही विचारच मनात उमटणार नाही. मी-मला असे सारखे म्हणत असलेला कोण बरे आहे असे स्वतःलाच विचारत रहा. जर तुम्ही आत्मा आहात तर तुम्ही प्रेम-स्वरूप आहात आणि प्रेमामध्ये तुम्ही सतत दुसऱ्यांचा, त्यांच्या प्रश्नांचा, त्यांना काय आवडेल, कसं बरे वाटेल असाच विचार करणार. स्वतःचा व स्वतःबद्दलचा विचार मनात येणारच नाही. तुम्हाला ही स्थिति मिळवायची आहे. तुम्ही एरवी धार्मिक असाल, चांगले सहजयोगी असाल तरीही सहस्त्राराची ही स्थिति जोपर्यंत तुम्ही मिळवत नाही तोपर्यंत मी तुम्हाला शाबास म्हणणार नाही. आणि हे तुमचे तुम्हालाच घडवून आणायचे आहे; त्यासाठीच ध्यान फार महत्त्वाचे आहे.

या प्रगतीच्या आड येणारे म्हणजे तुमचे मनच. तुम्ही मनाचे व्यापार नीट बघितले तर मनच तुम्हाला "माझं घर, माझे कुटुंब, माझी मुले" इ. आठवण करून देत राहते. आणि शेवटी पदरांत काहीच पडत नाही. कबीरांनी म्हटलेच आहे की बकरी जिवंत असेपर्यंत "मैं-मैं" करत राहते आणि तिला मारल्यावर आतडी धुतकीवर टांगून ठेवली की त्यांतून "तुही-तुही" असा आवाज येत राहतो; आणि इथेच सर्व संपून जाते असेही ते पुढे म्हणतात. म्हणून तुम्ही दुसऱ्याचा विचार करायला शिका. म्हणजे गुरूला किंवा देवाला "तुही" म्हणालात की तुमचा "मी" संपला, विरघळून गेला, सागरामध्ये विरघळून गेला. मग तुम्ही दुसऱ्याला "तू-तुला" असे म्हणू लागाल. हीच सहज-संस्कृती आहे.

अशा तऱ्हेने तुमच्या आणि इतरांच्या जीवनातल्या सर्व असत्य खोल्या गोष्टी गळून जातात. लोकांना उगीचच 'मला तुमच्याबद्दल प्रेम आहे' असं तोंडावर म्हणायची सवय आहे आणि पाठीमागे मात्र त्यांच्याबद्दल कारवाया करतात. सहजयोगी असे वागत नाहीत. त्यांची स्थिति वेगळी आहे पण तरीही असल्या गोष्टींबद्दल ते कॉन्शस असतात; आम्ही असे करत नाही, दारू पीत नाही, जेवणाबद्दल कुरकुरत नाही इ. बोलणे म्हणजे सूक्ष्म अहंकारच आला. खरं म्हणायचे तर तुम्ही आत्माच होता आणि आता आत्मा बनला आहात; मग हा अहंकार कशाला? मला कुणी म्हटले "तुम्ही आदि-शक्ती आहात याचा तुम्हाला अभिमान नाही का?" हा काय प्रश्न झाला? सूर्य जगाला प्रकाश देतो तर त्याचा काय त्याला अभिमान असतो? तुम्हाला माणसारखे तोंड-नाक आहे म्हणून त्याचा गर्व तुम्हाला होईल का? तसेच जर तुम्ही आत्मा आहातच मग त्याचा गर्व किंवा Conscionsness का वाटावा? तुम्ही आत्मा झाला आहात म्हणजे तेवढी गोष्टच जाणणे पुरेसे आहे. सोने सोनेच असते. त्याच्याशिवाय काही नाही. त्याचप्रमाणे मी सहजयोगी आहे ही जाणीवही गेली पाहिजे; आपण विशेष आहोत याची स्मृतीदेखील उरायला नको. म्हणून हीच गोष्ट ठामपणे समजून घ्यायची आहे की

माझा 'मी' संपला, पूर्णामध्ये, सागरामध्ये विरघळला, त्याच्या बिंदूलाही कसल्या मर्यादा नाहीत. तुमच्या चेतनेमध्ये आनंद पुरेपूर भरतो तेव्हाच ही जाणीव येते. मग उरतो फक्त आनंद व प्रेमाचे तरंग; मग तुम्ही जे काही बोलाल, कराल किंवा वागाल त्या सर्वांतून तुमच्या हृदयांतल्या ह्या आनंदाचाच आविष्कार होत राहील.

सहस्रारामधील हृदय-चक्राच्या पीठामध्ये सत्याचा प्रकाश भरून येतो. हे सत्य आपण ज्याला लौकिक भाषेत सत्य म्हणतो तसे नसते. पूर्वीपासून एक वचन सांगत असत की "सत्यं वदे, प्रियम् वदे" म्हणजे खरं आहे ते बोलावे तसेच दुसऱ्याला आवडेल असे बोलावे. मी असे सांगितले तर लोक म्हणायचे सत्य कटुच असते, मग या दोन्ही गोष्टी कशा जमणार? श्रीकृष्णांनी सांगितले, "सत्यं वदे, प्रियं वदे, प्रियं वदे." ते म्हणाले सत्य बोललेच पाहिजे पण ते लोकांना आवडेल, पसंत पडेल, त्यांच्या कल्याणाचे व आत्महिताचे असेल असे बोलावे, म्हणजेच ते 'प्रियं' असेल ते सांगावे. सुरुवातीला ते लोकांना आवडले नाही तरी नंतर त्यांना ते रुचेल व ते कबूल करतील; पण कठोर शब्दांत, दुसऱ्याला लागेल अशा शब्दांत ते सांगायची जरूर नाही. आजूबाजूच्या सर्वांनाच ठीक करण्याचे काम फक्त तुमचे नाही. पूर्वी सहजयोगी नेहमी दुसऱ्यांना "तुमचे हे चक्र पकडले आहे, ते चक्र खराब आहे" असे सांगत सुटत. पण हा सारा अहंकाराचा खेळ असतो. दुसऱ्याला तुच्छ म्हणण्याचा अधिकार तुम्हाला नाही. तुम्हीसुद्धा आधी तसेच होता. पण तुमच्याजवळ क्षमता असेल, तयारी व गहनता असेल तर अशा लोकांनाही प्रेमाच्या माध्यमातून तुम्ही ठीक करू शकाल. तुम्हाला ते कार्य करायचे नसेल तर मात्र ही सबब सांगणे सोपे असते. समजा एखादा आजारी रोगी असेल आणि डॉक्टरला त्यावर औषध देता येत नसेल तर तो वाऱ्यावर गेलात म्हणून हे दुखणे झाले असे सांगून मोकळा व्हायचा प्रयत्न करतो. पण त्या दुखण्याचे काय? तसेच काही सहजयोगी लोकांना दुसऱ्याच कुठल्या गुरुकडे गेलात, चुकीच्या मार्गाकडे वळलात, अमक्या-तमक्या चुका केल्यात म्हणून हा त्रास आहे असे सांगत सुटतात. त्याऐवजी काही न बोलता चुपचाप त्यांच्यावर काम करा. आणि ठीक करा. कोणी गुरू केला आहे का असं विचारायला हरकत नाही पण धिक्कार करून त्याचेच दोष काढू नका. हे सर्व वर सांगितलेल्या अहंकारातून Consciousness मधून येते. तुम्हाला सहजचे ज्ञान आहे, तुम्ही सहजबद्दल जाणकार आहात हे सर्व मी मान्य करते. पण जर त्यावद्दल तुम्ही अहंकारयुक्त भान ठेवाल तर तुमचे सर्व ज्ञान फुकट आहे. एकदा तुमच्यामधील ही मनभावी जाणीव संपली की तुम्ही खरे सहजयोगी होणार आहात. म्हणून तुमचे सर्वांचे सहस्रार असे कार्यक्षम बनेल अशी मला आशा आहे. आपल्याला साऱ्या जगाचा विचार करायचा आहे; फक्त सहजयोग्यांचा आणि साधकांचा नाही. साधक असतातच. पण मग इतरांचे कसे होणार? अनेक प्रश्न आहेत आणि अनेक कामे करायची आहेत. भारतामध्ये गरीबी खूप आहे, त्याच्यासाठी काहीतरी करायचा माझा विचार आहे. तुमच्या देशातही प्रश्न आहेत. तुमचे प्रश्न तुम्ही समजावून घ्या व त्यासाठी काय व कसे करायचे याचा विचार करा. हे कार्य मिशनरीपद्धतीने आपल्याला करायचे नाही किंवा काही किताब मिळवण्यासाठी तर नाहीच. नुसते असे कार्य आनंदासाठी करायचा प्रयत्न करा. म्हणजे मग समाजाबरोबर तुम्ही राहूनही त्यांच्यामुळे तुमची चक्रे बिघडणार नाहीत. मी एका पती-पत्नीला विचारले की तुम्ही कार्य का करत नाही तर म्हणाले आम्हाला आमचा अहंकार पुन्हा वाढेल याची भिती वाटते. असले सर्व प्रश्न मिटले पाहिजेत आणि तुम्ही अशी स्थिति मिळवली पाहिजे की तुम्हाला कशापासुन भय उरणार नाही आणि स्वतःबद्दल विपरीत कल्पना पण राहणार नाहीत. तुमच्याजवळ सर्व शक्ती आहेत, एवढंच नव्हे तर त्यासाठीच तुम्हाला निवडलेले आहे. तुम्हीच तुमची शक्ती वापरली नाहीत तर त्याचा काय उपयोग? दिवा जर लावला नाही तर असून त्याचा काय फायदा? आणि ही शक्ती वापरतानाही तुम्ही कुणी विशेष आहात, इतरांपेक्षा मोठे आहात वगैरे कल्पना मनात आणू नका. म्हणजे मग त्याचा प्रसार जोरात आणि दिमाखात होईल.

जगांत खूप मूर्ख लोक आहेत, तुम्हालाही ते माहीत आहे पण त्यांच्याबरोबर हसत खेळत रहा म्हणजे अडचण वाटणार नाही आणि कार्य करतानाही अशा तऱ्हेने करा की ते दुखावले जाणार नाहीत. आणि तुम्ही जे करता-सांगता त्याचे परिणाम त्यांना समक्ष दिसतील असे करा. तुम्हालाही असे परिणाम व सुधारणा होत असल्याचे प्रत्यक्षात कळले पाहिजे. काही बुद्धिवान माणसांना कार्य करण्याची, त्याला योग्य असे बोलण्याची व वागण्याची उपजत कला असते. परमेश्वरी प्रेमशक्ती तुमचा सांभाळ करेल आणि लोकांशी कसं बोलायचं, त्यांना कसं हाताळायचं हे सर्व ज्ञान तिच्याकडून मिळेल.

माणसामध्ये सगळ्यांत वाईट गोष्ट कोणती आहे मला सांगता येणार नाही. श्रीकृष्ण म्हणत, सगळ्यांत वाईट म्हणजे माणसाचा राग; पण मला वाटते मत्सर हा माणसाचा सर्वात वाईट गुण. मत्सर-कशाबद्दलही - हा एका घाणीसारखा असतो. सहजयोगामध्ये लोक ही

## नवीन सहज स्कूल

प.पू. श्री माताजींच्या ७५ व्या वाढदिवसाच्या मुहूर्तावर पठाणकोट येथे भारतीय सहजयोग्यांच्या मुलांसाठी नवीन शाळा (वसतीगृहासह) सुरू होत आहे. सुरवातीला इ.१ ते ३ सुरू होणार आहेत व दरवर्षी एक एक नवीन इयत्ता सुरू होऊन १० +२ अभ्यासक्रम होणार आहे. इ. १साठी ५ वर्षे ही वयाची अट आहे.

१) शैक्षणिक माध्यम - इंग्लिश

२) पंजाब बोर्डबरोबर संलग्न

३) फी : अ) प्रवेश रू. १०,०००/-

ब) दर महिना रू २५००/- (बोर्डिंगसह)

क) अभ्यासक्रम सुरूवात ७ एप्रिल ९८

ड) शेवटची तारीख ३१ मार्च ९८

४) पत्ता : प्रिन्सिपॉल, सहज पब्लिक स्कूल

Blossom Time Village (Pathankot)

भावना बोलून दाखवणार नाहीत कारण मला ते आवडत नाही.- पण त्यामुळे बऱ्याच कटकटी निर्माण होतात. म्हणून आपल्या मनामध्ये मत्सर वर येत नाही ना हे सतत तपासत रहा. मी जेव्हा तुम्हाला भेट-वस्तू देते तेव्हाही माझ्या मनात त्यामुळे तुमच्यामध्ये मत्सर, भेदभाव पैदा होणार नाही ना अशी शंका येते. पण तुम्हाला तसे वाटता कामा नये. माताजी विसरल्या असतील, त्यांच्याकडे अमुक-अमुक वस्तू संपल्या असतील असा विचार करा. पण सहजयोग्यांतही असा मत्सर चटकन् वर येतो. तसेच मी एकाला भेटले पण दुसऱ्या कुणालाही भेटले नाही तर लगेच तोच प्रकार. कधी कधी लोक माझ्या भेटीसाठी हात धुऊन मागे लागतात. पण कशासाठी? मी सदासर्वदा कुठेही तुमच्याजवळच आहे असे तुम्ही म्हणता मग माझ्या भेटीसाठ का जरूर वाटते? तुमच्यापैकी विशेष कुणासाठी नाही तर तुम्हा सर्वांच्यासाठी मी आहे. पण तरीही काहींना वाटते की ते कुणी विशेष असल्यामुळे त्यांना मी भेट दिलीच पाहिजे. या सगळ्या गोष्टी एकदा सागरांत आल्यावर तुम्ही सोडून दिल्या पाहिजेत. मग सागराबरोबर तुम्ही कुठे चालला आहात, कधी किनाऱ्याजवळ येणार आहात याची तुम्हाला जराही फिकीर नसते. सतत सागरांतच लाटांबरोबर वर-खाली करत रहायचे एवढंच काम. दुसऱ्यांवर हुकूमत न गाजवता, गाजावाजा न करता, कशाचेही प्रदर्शन न करता या प्रेमसागरांत डुंबत राहणे ही एकच गोष्ट तुम्ही मिळवायची आहे. "अपनेमें समाये हुओ" असे बनायचे आहे. आपल्याला जेव्हा काही हवे असते तेव्हा आपण ते मिळवण्याची धडपड करतो. पण या समाधानाने तुमचे हृदय भरलेलेच राहते. मग कशाचीही कमतरता नाही. मग फक्त हा आनंद इतरांना वाटायचा एवढीच एक उर्मी राहते. सहस्त्राराची ही आदर्श स्थिती आहे.

साऱ्या जगाचे सहस्त्रार उघडायचे आहे; हेच कार्य आपल्याला करायचे आहे, म्हणून जगापासून दूर जाऊन अदृष्ट होण्यांत अर्थ नाही. अर्थात ध्यानांमध्ये तुम्ही त्याच अवस्थेत येता. सहजयोगी म्हणून तुम्हा लोकांची श्रेष्ठता किती मोठी आहे, तुमची जबाबदारी व महत्त्व किती महान आहे हे लक्षांत ठेवा. या काळातच तुम्ही जन्माला आलात, आत्मसाक्षात्कार मिळवलात तो कशासाठी? तर सर्व मानवजातीच्या उद्धारासाठी, सर्व मानवजातीचे परिवर्तन करण्यासाठी, सर्व जगामध्ये परमेश्वराचे राज्य आणण्यासाठी आणि हे तुमचेच कार्य आहे, तुमच्याकडूनच ते होणार आहे.

सर्वांना परमेश्वराचे अनंत आशिर्वाद.

आपण चैतन्य लहरीहून अधिक संकल्पनांना महत्त्व देऊ नये. तुम्ही सतत लक्षात ठेवायला हवे की आपण आता साक्षात्कारी जीव आहोत. आपल्याला चैतन्य लहरी प्राप्त झाल्या आहेत. परीक्षा करण्याचा हाच एक मार्ग आहे. याच पद्धतीने समजावून घ्यायचे आहे. दुसऱ्यांना समजू शकण्याचा चैतन्य लहरी हा एकच मार्ग आहे दुसरा कोणताही नाही. तुम्हाला वाटेल व्यक्ती दिसायला चांगली आहे, वागण्यात लाघवी आहे पण विचारातून कदाचित साप बाहेर येईल.

म्हणून माणसाला पारखण्याचा चैतन्य लहरी हाच एक उत्तम उपाय आहे. तुम्हाला काय समजले किंवा वरवर पारखण्याच्या पद्धती नव्हे अजून सुद्धा दुसऱ्याला पारखण्यासाठी आपण अनेक प्रकारचे आपल्या मनावर झालेल्या संस्काराचा उपयोग करतो. हे संस्कार आपल्या जजमेंटला, आपल्या पारखण्याला एकांगी स्वरूप देतात. म्हणून चैतन्य लहरी पाहणे हा उत्तम उपाय आहे. चैतन्य लहरीच्या माध्यमातून काय घडत आहे ह्याचे खरे ज्ञान मिळेल.

श्री माताजी १६-५-८७

एकादशांची शक्ती तुमहाला केंद्रबिंदूपासून दूर नेते व त्याच्यामुळे तुम्ही बाहेर फेकले जाता.

सहजयोग कोणाच्या पाया पडत नाही. कोणाची खुशामत करीत नाही. कोणाच्या विनवण्या करत नाही. तुम्हाला रहायचे असल्यास पूर्णपणे रहायला हवे रहायचे नसल्यास, सहजयोग तुम्हाला अपेक्षेपेक्षाही जास्त जलद बाहेर फेकतो.

सहजयोगाचे बाबतीत हेच अवघड आहे. हा बाहेर जाण्याचा रस्ता आहे हे मी तुम्हाला सांगून ठेवते. एक आई म्हणून तुम्हाला सांगते की सहज योग तुमहाला बाहेर फेकण्यास उत्सुक आहे."

श्री माताजी २१-५-८४

तुम्हाला मी जे प्रेम व करूणा दिली आहे ती अंतर्यामी साठवून ठेवून दुसऱ्यांना द्यायला हवी. अन्यथा तुम्ही अविकसित रहाल व संपूर्ण संपून जाल. तुमच्यामधील प्रेम व करूणा बाह्यात प्रवाहित व्हायला हव्या."

श्री माताजी २८-७-८५

"एक साधी गोष्ट आहे. तुम्हाला मी नाकात तुप सोडण्यास सांगितले आहे. ही अगदी साधी पण महत्त्वाची गोष्ट आहे. तुमच्या सगळ्यांचे हंसा चक्र खराब आहे. आणि एडस् च्या आजाराचे खराब हंसा चक्र एक लक्षण आहे. परंतु इतकी साधी गोष्ट सुद्धा नियमितपणे केली जात नाही."

श्री माताजी ५-५-८७

# गुरू-पुजा

## प.पू. श्री माताजी निर्मला देवींचे भाषण (सारांश)

१९९७

आजची पूजा सर्वसाठी फार महत्त्वाची आहे. तुम्हा सगळ्यांना आत्मसाक्षात्कार मिळाला आहे. इतरांना तो करून देण्यासाठींचे सर्व ज्ञानही तुमच्याजवळ आहे. म्हणून तुम्हाला जे मिळाले आहे त्याची नीट जाण असणे महत्त्वाचे आहे. पहिली गोष्ट म्हणजे तुम्ही कार्य करून इतरांना जागृती देण्याचा प्रयत्न केला नाही तर तुमचा स्वतःवरचा विश्वास दृढ होणार नाही. स्वतःबद्दल तुम्हाला आत्मसन्मान येणार नाही, दुसरी गोष्ट म्हणजे तुमच्याजवळचे चैतन्य दुसऱ्यांना देतांना तुम्ही त्यांच्यामध्ये अडकून जाणार नाही याची खबरदारी घ्या. असे अडकणारे काही लोक मी पाहिले आहे; कुणाला जागृति दिली की लगेच आपण फार मोठे कार्य केले असे समजून त्या नवीन व्यक्तीवर काम करायला लागतात; त्या व्यक्तीचे नातेवाईक, कुटुंब या सगळ्यांच्या मागे लागतात. तुम्हाला आता माहीत झाले असेल की सहजयोगांत नवीन आलेल्या व्यक्तीच्या अगदी जवळच्या नातलगालाही तो आत्मसाक्षात्काराचा योग असेल असे म्हणता येणार नाही.

गहनता मिळवण्यासाठी सामूहिकता हा एकच मार्ग आहे, त्यासाठी दुसरा उपाय नाही. आश्रमापासून दूर स्वतंत्र्यपणे राहून आपण प्रगति करून घेऊ शकतो असे कुणाला वाटत असेल तर तो सहजयोगाची विचार-धारा नाही. पूर्वीच्या काळी लोक हिमालयात जायचे आणि एकटे-एकटे रहायचे. त्यांनी फक्त एक किंवा दोनच शिष्य अध्यात्मिक उन्नतीसाठी तयार केले. आपण आत्ता अध्यात्मिक उन्नतीबद्दल बोलत नाही तर तुमची सामूहिकता बळकट कशी होईल इकडे बघत आहोत. अशा सामूहिकतेनेच साधक स्वतः सामूहिक बनतो, सामूहिकतेचा आनंद मिळवतो, सामूहिकतेत कार्य करू शकतो आणि सामूहिकता बळकट कशी होईल इकडे बघत आहोत. अशा सामुहिकतेतच साधक स्वतः सामूहिक बनतो, सामूहिकतेचा आनंद मिळवतो. सामूहिकतेत कार्य करू शकतो आणि सामूहिकतेत राहू शकतो. अशा माणसामधे नवीन नवीन शक्ती जागृत होतात; आणि अशी शक्ती फार सुक्ष्म असते. कुठेही शिरकाव करू शकते, अगदी अणूंमध्ये वा मनुष्यामधेहि. आणि तुमची स्वाभाविक प्रवृत्ती सामूहिक असली तरच हे घडू शकते. आणि सामूहिकतेमधूनच आजच्या काळाला आवश्यक असलेले बळकट सहजेयोगी तयार होणार आहेत.

सध्या जगांमध्ये सर्व देशांमध्ये गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. मी अमेरिकेत गेले होते तेव्हा आपण नरकांत तर आलो नाही ना असे मला वाटू लागते. अमेरिकन लोकांमध्ये कसला धर्म नाही, धर्मावर त्यांचा विश्वास नाही. किंबहुना ते अधर्माची पुजाच करतात. आणि ते लोण आता जगात सगळीकडे पसरत चालले आहे. एवढंच नव्हे तर त्यांत काही चूक नाही असेच लोक म्हणून लागेले आहेत; कितीही सांगितले तरी त्यांना पटत नाही. आपला समाज, कुटुंब व आपले स्वतःचे आयुष्य या अधार्मिक राहणीमुळे कसे रसातळाला जाणार आहे इकडे त्यांचे लक्षच नाही. साऱ्या वातावरणांत इतका अधर्म माजला आहे की त्यांच्या डोक्यात अशा विचित्र कल्पना कुठून घुसतात समजेनासे होते. मी ते प्रकार सांगितले नाही तरी तुम्हाला माहीत आहेत. पण तुम्हाला पुढची पीढी वाचावयाची असेल तर तुम्ही आधी स्वतः आदर्श गुरू बनले पाहिजे. त्याशिवाय तुम्ही नुसता सहजयोग सांगत सुटलात, स्वतःला सहजयोगी म्हणजे श्रेष्ठ समजू लागलात तर त्याला यश येणार नाही. म्हणून ही शक्ती, क्षमता कशी मिळवायची ते आपल्याला बघायचे आहे.

तुम्ही गुरूबरोबर कसे वर्तन करायचे हे मला सांगणेजरा अवघडच आहे. लोकांकडून तुम्हाला कळले असेलच. तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळाला आणि थोडेसे स्थिरावलात की अगदी आपसुकपणे तुम्ही नम्र होता; आणि या नम्रतेमधून गुरूचे गुण आत्मसात करण्याकडे तुमची प्रवृत्ती वळते. तुमचा गुरू जर अगदी उच्च स्थितीवरचा असेल तर तुम्हाला त्याच्या पायापाशीच बसायला हवे. माझ्या साध्या-भोळ्या स्वभावाचा काही लोक जास्त फायदा घेत असतात; बऱ्याचजणांनी मला अशा लोकांना ठीक करण्याबद्दल सांगितले, कारण त्यांच्या मते असे लोक माझ्याबरोबरीचे आहोत असे समजतात. मी म्हणायचे त्यांना धडा मिळणार आहे. पण कधी कधी त्याचा परिणाम होत नाही आणि ते माझ्याशी ही मित्राबरोबर बोलतो तसे बोलतात.

सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे संपूर्ण नम्रता, तुम्ही खूप

नम्रपणा घेतला पाहिजे. हे सारखे तपासत रहा. उदा. एखाद्याशी बोलताना तुम्ही नम्रपणे बोलता का? दुसऱ्याचा विचार नम्रपणा ठेवून करता का? आपल्या पत्नी व मुलांबरोबर वागताना नम्रपणा असतो का? ज्याला गुरू बनायचे आहे त्याने हा नम्रपणाचा गुण पुरेपूर बाणवून घ्यायलाच हवा. जणु नम्रतेच्या सागरांत उडी मारल्यासारखे नम्र व्हा. काही लोकांना वाटते की नम्र झाले की इतर लोक आपला फायदा करून घेतील. तुम्हाला असा कोणी त्रास देऊ शकत नाही, कारण परम चैतन्य तुमच सतत रक्षण करत असते व तुमची काळजी घेत असते . तुम्हाला हे समजते हे मला माहीत आहे पण तुमच्यापैकी किती जणांचा प्रामाणिक विश्वास त्याबद्दल आहे? तसे असेल तर तुम्हाला कधीही घाबरून जाण्याची काळजीने व्याकूळ होण्याची किंवा फालतू कल्पनांच्या आहारी जाण्याची वेळ येणार नाही. पण तुमच्या मनांत शंका आली की आता आपलं कसं होणार किंवा आपले काम कसे होणार तर मात्र हे परमचैतन्य तुमच्यापासून दूर जाते. परमचैतन्याचा हा खेळ तुम्ही साक्षीभावाने पहात चला. समजा तुम्ही या गोष्टीवर भरवसा न ठेवता काहीतरी अहंकाराच्या भावनेतून करून दाखवायचा प्रयत्न केलात तर हे परमचैतन्य तुम्हाला योग्य प्रकारे धडा देईल आणि तुम्ही पुन्हा तसे करण्याच्या भानगडीत पडणार नाही.

आपण सहजयोगांत का आलो आहोत हेच खरं-म्हणजे तुम्ही समजून घ्यायचे आहे. अगदी खोलात जाऊन पाहिले तर परम-सत्य जाणण्यासाठी तुम्ही सहजयोग घेतला, आणि चैतन्यलहरींमधून तुम्हाला ते समजले. म्हणून त्याच्याच आधारावर तुम्ही प्रत्येक व्यवहार व कार्य केले पाहिजे, आणि त्यांचा स्वीकार केला पाहिजे. काही वेळा लोकांना आपली व्हायब्रेशन्स ठीक आहेत असे वाटते, आणि व्हायब्रेशन्सवरून त्यांना जे मिळते ते उत्तम आहे असेही ते समजतात. ही समजून कधी ठीक करायची हा अवघड प्रश्न आहे. हे अहंकारामधून होते. कारण अहंकार आला की आपली चूक आपल्या लक्षात येत नाही. तसेच व्हायब्रेशन्स तुम्हाला काय सांगत आहेत हे तुम्ही नीट लक्षात घेत नाही. "मी काही तरी चूक करत आहे, मी असे करायला नको होते," असे एरवी तुमच्या लक्षात येण्यासारखे असूनही हा अहंकार तुम्हाला अडवतो आणि बिघडवतो. प्रतिक्रियेमध्ये तुम्ही सुक्ष्माकडे चालला आहात की जडामधे अडकला आहात इकडे अशा वेळी तुम्ही पहात चला. हा उपाय सगळ्यांत चांगला. काही लोक प्रत्येक लहान-सहान वस्तूंच्या - झाडाच्या -फुलांच्या-भौतिक वस्तूंच्याही-व्हायब्रेशन्स तपासत राहतात असे मी बघते, हे कशाकरता करत बसायचे? त्यातून काही फायदा होणार आहे का? त्यांना वाटते की अशी व्हायब्रेशन्स तपासली व चांगली निघाली की आपल्याला काळजी नाही, हे बरोबर नाही. भौतिक गोष्टींबद्दल किंवा भौतिक वस्तूंच्या खरे-खोटेपणाबद्दल व्हायब्रेशन्स वापरणे योग्य नाही; त्याने व्हायब्रेशन्सना कमीपणा येऊन त्यांची किमत आपण कमी लेखतो. कधी कधी आपल्या उन्नतीच्या आड येणाऱ्या गोष्टी व्हायब्रेशन्स दाखवीत असतात. एकदा मी एकाला एका ठिकाणी जायला सांगितले तरी तो गेला नाही, मी कारण विचारले तर, तेथील व्हायब्रेशन्स चांगल्या नाहीत असे त्याने सांगितले; मग मी म्हणाले, "म्हणूनच तर तुम्हाला तिथे जायला सांगितले होते, तिथल्या व्हायब्रेशन्स जर चांगल्या असत्या तर तुमची तिथे काही जरून नसती." त्याला काहीतरी मदत करण्यासाठी मी तिथे पाठवीत होते पण त्याने आधीच स्वतःचा निर्णय घेतला.

खरं काय होते ते म्हणजे आपल्याला ऐष-आरामाची सवय झालेली असते, आणि सहजयोगानेच आपले सर्व प्रश्न सोडवावे अशी आपली समजूत असते. आपल्या सर्व इच्छा पुऱ्या झाल्य तरच सहजयोग खरा अशी चुकीची भावना होते. इच्छा काय काय असतात-मुलाला बरं नाही, नवरा नीट वागत नाही, माझे स्वतःचे घर हवे. इ.इ. म्हणजे आपले मन सतत मागण्या करत असते. आणि ह्या गोष्टी मिळाल्या नाहीतर तर सहजयोगाला दोष द्यायचा! असे झाले की तुमची श्रद्धा डळमळीत होऊ लागते, सहजयोग रूजत नाही, पण एकदा सहजयोगांत स्थिर झाला की तीच व्यक्ती म्हणू लागते की, 'काहीही झाले तरी सहजयोग सोडणार नाही.' समजा कुणाला मृत्यू आला, आता सहजयोगांत कुणाला मरण नाही, तशी इच्छा झाली तरी ते तुमच्या हातात नाही कारण ते सारे त्या परमचैतन्याच्या इच्छेनुसार होणार असते. कारण तुमची इच्छा ही परमेश्वराची इच्छा नसते, त्याची इच्छा म्हणजेच परमचैतन्य. उदा. मी अमेरिकेत गेले आणि तिथल्या निगेटिव्हिटीचा मला त्रास झाला, वेदना झाल्या, दुखणी झाली पण मला ते सहन करायलाच पाहिजे कारण त्यामुळेच अमेरिकेतल्या सहजयोग्यांना कळेल की तेथील भ्रष्ट लोकांचा उद्धार करण्यासाठी किती त्रास भोगावा लागतो. ते लोक किती मूर्ख आहेत आणि पैसे घेऊन फसवणाऱ्या लोकांचे त्यांना कसे आकर्षण वाटते तेही समजेल. मला तर बऱ्याच लोकांनी सांगितले की तुम्ही तीनशे डॉलर घेऊन हे कार्य करु लागलात की हजारो लोक सहजयोगांत येतील . पण मी म्हणाले की असे लोक खरे शिष्य बनणार नाहीत. त्यांची तशी कल्पना असेल तर ते महामूर्खच म्हणावे लागतील. पैसे मोजल्याशिवाय आत्मसाक्षात्कार विनामूल्य मिळतो हेच आपले पहिले तत्व आहे.

न्यू जर्सी मधील काही श्रीमंत गुजराथी मंडळींनी इथल्या सहजयोग्यांना विचारलेही की आत्मसाक्षात्कार इतक्या सहजपणे मिळणे कसे शक्य आहे. शास्त्रातही हेच सांगितले आहे की आत्मसाक्षात्कार मिळणे ही फार अवघड व कष्टसाध्य गोष्ट आहे. या प्रश्नांचे कसे उत्तर द्याव हे तेथील सहजयोग्यांना कळत नसे. अशा वेळी असे म्हणावे, "हे अवघड आहे, असे सामूहिक लोकांना एकाच वेळी हा अनुभव देणे अवघड आहे तुम्ही म्हणता ते खरे आहे. पण जर कोणी तसे खरंच करु शकत असेल तर विचार का करू नये? प्रत्यक्ष कसे होते तेच पहा ना!" असे मूर्खासारखे प्रश्न विचारणारे असतातच, अशांना तर तुम्ही नम्रपणे सांगा, "सर, पण हे मिळायला माणूसही तसा परितक्व हवा." मग ते त्यांच्याकडून पैसे उकळणाऱ्या लोकांच्या मागे लागतील, तऱ्हेतऱ्हेचे गुरु करतील. अशा लोकांची काय अवस्था होत असेल याचेच मला नवल वाटते.

म्हणून मूर्ख, 'मूढ' लोकांना, अक्कलशून्य लोकांना साक्षात्कार होत नसतो. त्यांना सोडून द्या, त्यांच्याशी वादविवाद करण्याच्या भानगडीत पडू नका. त्यांना अधिकार असेल तर तो आत्मसाक्षात्कार मिळवण्याचा, वादविवाद करण्याचा नाही. तुम्ही लक्षात हे ठेवायचे की नम्रतेबरोबरच आपण आत्मसन्मानाने वागणे जरूरीचे आहे. कारण तुम्ही गुरु बनला आहात आणि म्हणून थिल्लरपणाने तुम्ही वागू शकत नाही तुमचे जीवन गौरवास्पद दिसले पाहिजे. त्यामधूनच तुमचे व्यक्तिमत्व प्रसन्न होत राहील, तुमच्याबद्दल कुणाच्या मनात अढी निर्माण होणार नाही. तुमच्या जीवनशैलीमधूनच तुमचे वैशिष्ट इतरांना जाणवेल.

हे व्यक्तिमत्व तुम्ही कसे मिळवणार आहे? पाश्चात्य देशांमध्ये अहंकार हा सगळ्यांत मोठा प्रश्न आहे तर पौर्वात्य देशात संस्कार (प्रति अहंकार) हा प्रश्न आहे. हा अहंकाराचा प्रकार कुठून येतो. मला समजत नाही, रोजच्या साध्या-साध्या गोष्टीमधेही ते लोक किती अहंकारी आहेत हे नजरेस येते. मी अमेरिकेत गेले होते तेव्हा काळे व गोरे हा वर्णभेद फार स्पष्ट दिसून आला आणि आश्चर्य वाटले. वर्ण हा जन्मापासून म्हणजे परमेश्वराकडून आलेला; सर्वांची घडण एकसारखी असती तर तो दांभिकपणा झाला असता. वैचित्र्य व निराळेपणा हवाच. तसेच आविर्भाव आणि ताकद भिन्न हवी. नाहीतर जगात सगळीकडे तोच-तोच छापीलपणा दिसून आला असता. पण तिकडच्या सामाजिक घडणीमधे मनुष्याच्या मनावरही परिणाम झाला आहे. म्हणून अशा तऱ्हेची सामाजिक व्यवस्था त्याज्य आहे. गौर-वर्णीय मनुष्य पुरूष वा स्त्री क्रुर असू शकतो. तर कृष्णवर्णीय कनवाळू, उदार असू शकते. म्हणजे रंगाच्या स्वभावाशी काही संबंध नाही. पण कृष्णवर्णीयांचा सतत धिक्कार करत गेल्यामुळे आता ते प्रतिकार करू लागले आहेत. आणि त्यांच्या तशा प्रतिक्रियेमधे क्रूरपणा व पशूपणा दिसला तर समजण्यासारखे आहे. पण माणसा-माणसांत असा मतभेद अगदी सहन न होण्यासारखा आहे. असा भेदभाव पाळणारे लोक सहजयोगाला योग्य नाहीत. सहजयोग्यांमध्ये असा भेदभाव करणारे योगी गुरू बनणार नाहीत.

भारतातील जाति-व्यवस्थाही तितकीच वाईट आहे, त्याला काही आधार नाही व अर्थ तर मुळीच नाही. काही जाती उच्च कुळीच्या तर काही हलक्या कुळीच्या समजल्या जातात. प्रत्येक जातीचे लोक दुसऱ्यावर कितीही अन्याय करू शकतात. हलक्या जातीमधे ही चांगले लोक आहेत. भारतामधे अनेक संत खालच्या जातीचेच होते. या जाती मानवानेच निर्मण केल्या. मानवनिर्मित काही च आपल्याला चालत नाही, त्याचा शेवट विनाशच असतो. द्वेषामधून द्वेष वाढतच जातो आणि त्याला अंत नाही, तुम्ही तुमच्या मनातील द्वेष-भावना दूर केली नाहीतर सहजयोगी नाहीत. जन्मामुळे तुम्ही उच्च वा नीच जातीचा ठरत नाही. जगामधील आजचे प्रश्न माणसाच्या मनातील श्रेष्ठत्वाच्या फालतू मनोवृत्तीतून निर्माण झाले आहेत. सामूहिकतेतूनच त्यामधे बदल घडून येऊ शकते. उदा. आश्रमामधे मला वाटते सगळ्या प्रकारचे व धर्मांचे लोक असले तरी त्यांना समान अधिकार असावेत व सर्वांनी समजूतदारपणे, प्रेमाचे व परस्पर आदराचे संबंध राखून रहावे. तसे नसेल तर तो आश्रम कसला? प्रेमामधूनच हे सर्व भेदभावाचे प्रकार धुतले जाणार आहेत. हृदय प्रमाने भरलेले असेल तर हे वरवरचे भेदभाव तुमच्या नजरेतही येणारे नाहीत.

आज आपण गुरुमहात्म्य साजरे करत आहोत. आपले गुरु कसे होते? त्यांचे जीवन कसे होते हे पहा. भारतात आणि इतर देशातही अनेक संत व सूफी होऊन गेले. त्यांनी जातीवरुन किंवा वर्णावरून कधीच भेदभाव केला नाही. ख्रिस्त, बुद्ध हेही सर्वांबद्दल समभाव बाळगत होते, मानवप्रणित कल्पना त्यांच्या डोक्यातच शिरत नव्हत्या. आपल्या सर्व कल्पना व रूढी मानवाने निर्माण केल्या व साक्षात्कारानंतरही आपण कधी कधी त्यांचे पालन करण्याचा प्रयत्न करत राहतो. नुसत्या बोलण्यातून त्या सुटणार नाहीत पण कृतीमधून त्यांच्यापासून सुटका करून घेता येते. हे अगदी सोपे आहे. नुसते ध्यान लावून आपण किती लोकांवर व कां प्रेम करतो इकडे लक्ष द्या. अनुकंपा किंवा दया म्हणून नव्हे तर निखळ प्रेम आपण दुसऱ्याबद्दल बाळगतो का? इकडे लक्ष द्या. मी याची अनेक सुंदर उदाहरणे बघितली आहेत पण तरीही तुमच्या मनात ज्या कल्पना ठाण मोडून असतात

त्यांचेही उच्चाटन करायला हवे. सहजयोगामधे ज्याला गुरू बनायचे आहे त्याला हे फार आवश्यक आहे. स्वच्छ अंतःकरणाचे, उदार अंतःकरणाचे आणि हृदय प्रेमाने भरलेल असे व्यक्तिमत्व तुमचे असले पाहिजे, म्हणजे तुमच्या हृदयातून परचैतन्याचे मंजुळ स्वर बाहेर येतील. मानवी कल्पनाच हृदयात भरून राहिल्या तर कसे होणार मला समजत नाही. शस्त्रक्रिया करून दुसरे हृदय बसवले तरी काही उपयोग नाही म्हणून अशा मानवी समजूतीमधून तुम्हाला सामूहिकता मिळत नसते.

म्हणून आत्मपरीक्षण करणे फार जरूरीचे आहे. आपण सामूहिक आहोत का एकमेकांचे दोष काढत आहोत? इतरांच्याबद्दल मतप्रदर्शन फार चालते. एकत्र राहिलात की हे कळून येते. एरवी समजत नाही. एकत्र राहण्यामुळे आपल्यात काय कमी आहे हे स्वतःलाच कळते, कसे असायला पाहिजे हेहि लक्षात येते. हृदय प्रेमाने भरलेले असले की सगळे कसे शांत शांत वाटते, आणि प्रत्येक क्षण आनंददायी होतो. शबरीची उष्टी बोरे श्रीरामांनी खाल्ल्याची गोष्ट तुम्हाला माहीत आहेच. प्रेम व शक्ति हेच त्या कथेचे सार आहे. शिवाय त्या गोष्टीमधे सीता ती बोरं मागते पण लक्ष्मण मागत नाही तर उलट रागावतो. तो कच्चा सहजयोगी असतो! या गोष्टीचे तात्पर्य काय तर गुरू बनण्यासाठी तुमची योग्यता व श्रेष्ठता तुमच्या हृदयावरून तोलली जाते, त्या हृदयातील प्रेम हीच त्या परीक्षची कसोटी ठरते. अशा व्यक्तीमधे कृत्रिमतेचा अंकूर सुद्धा नसतो, तिचे वागणे पूर्णपणे नैसर्गिक असते. बोलण्या-चालण्याच्या कृत्रिम पद्धतीमुळे बरेच प्रश्न निर्माण होतात. उदा. अमेरिकेत न्यूयॉर्कमधील आपल्या आश्रमात एक अत्यंत शिस्तप्रीय महिला होती. काटे चमचे कसे ठेवायचे इथपासून प्रत्येक बाबतीत कडक शिस्त. त्यामुळे बरेच जणांना तिने दुखावलेही. सहजयोगामधे अशी कडक शिस्तीची जरुरी नाही. कारण तुम्ही गुरु झालात म्हणजे कुठेही राहू शकता, सारे काही खाऊ शकता. मी असेही सहजयोगी पाहते जे जेवण वाढल्याबरोबर लगेच खायला सुरवात करतात, जणू वाट पहात असल्यासारखे. एकदा मी त्यांच्याबरोबर जेवायला होते तेव्हा त्यांनी प्लेट्समधे पदार्थ भरून वाढले आणि लगेच प्लेट्स उचलायला लागले. मी तर कुठल्या पदार्थला हातही लावला नव्हता. भुकेची वासना ही सर्वांत क्षुद्र इच्छा. जो गुरु असतो त्याला तुम्ही काही दिले काय, न दिले काय फरक वाटत नाही. अहंकाराला ताब्यात ठेऊन ही अवस्था मिळवता येते. आपल्यापेक्षा आधी दुसऱ्याला प्लेट दिली तर काही लोकांना राग येतो. सहजयोगामधे मी असे तऱ्हेतऱ्हेचे प्रकार पाहिले आहेत. गुरु व्हायचे असेल तर क्षुधेची काही पर्वा वाटून घेऊ नका. तसे सहजयोगात बरेच प्रश्न सुटतात. दारू, मादक द्रव्यसेवन अशी अनेक व्यसने सुटतात. किती आशीर्वाद . मी जर बऱ्याच उच्च स्थितीपासून सुरुवात केली असती तर किती मिळवू शकले असते आणि तुम्हाला कसे वाचवू शकले असते मला सांगता येणार नाही. पण ही एक गोष्ट चांगली झाली आहे. तुमच्यामधे परिवर्तन घडवून तुम्हाला सुंदर मानव घडवणे. ज्यामुळे सर्वांचेच लक्ष तुम्ही वेधून घ्याल असे होणे! गुरुपद हे तुमच्या प्रेमशक्तीमधूनच येणार आहे. म्हणजे एकाच ऊधर्मी वागणुकीचे दहा लोक, एकाच धर्मचे वा एकाच देशाचे दहा लोक असे जमले तर काही विशेष नाही. म्हणजे तुम्ही गुरुपदाची योग्यता अजून मिळवली नाही. गुरु झालेल्या व्यक्तीला सगळ्या संस्कृतीचे लोक आवडतात. सर्व प्रकारचे सौंदर्य आवडते आणि ही सुंदर स्थिति त्यांच्या दैनंदिन व्यवहारातही दिसून येते. कुणालाही त्याच्या जातीमुळे, वर्णामुळे किंवा समाजातील मान्यतेमुळे तुम्ही कमी लेखू नये. आपल्या सर्व साधू संतानी त्यांच्या प्रत्यक्ष जीवनातून हेच दाखविले आहे; तुकारामाने तर आपल्याला हलक्या कुळात जन्माला घातले म्हणून देवाचे आभार मानले. तसे ते नव्हते पण तसे म्हणायचे. आपल्या सर्वांना आपला वंश, जन्म, व्यक्तित्व किंवा मोठेपणा अशा सर्व गोष्टींचे मान सोडून द्यायचे आहे. संत आणि सामान्य माणूस याच्यातला फरक कुणाला ओळखता येणार नाही असे असावे. संत असल्याचाही अभिमान काही मंडळींना असतो.

अमेरिकेत गेलेले रशियन लोक अगदी वेगळचे असल्याचे पाहून मला आश्चर्य वाटते. ते माझ्याकडे नजर वर करून पहात नाहीत. खूपच गहन आहेत ते. त्यांची व्हायब्रेशेशन्स तर उत्कृष्टच. कदाचित कम्युनिझमला वैतागून ते अमेरिकेत आले असावेत. इथे त्यांनी सर्व प्रकारचे स्वातंत्र्य आणि त्यातून निर्माण झालेले वेडेवाकडे प्रकार पाहिले. अशा दोन टोकाच्या संस्कृती पाहिल्यानंतर ते आत्म्याच्या गहनतेत उतरले. त्यांच्यात इतकी एकी आणि कार्यक्षमता आहे की ते आधी कसे मला भेटले नव्हते याचे मला आश्चर्य वाटले. याला कारण म्हणजे त्यांच्या डोक्यात पारंपारिक धर्माच्या काहीच कल्पना नव्हत्या, किंबहुना ते धर्म असा काही मानतच नव्हते. गुरु हा कोणत्या एका धर्माचा असा नसतो. कारण आपण ज्याला सामान्यतः धर्म समजतो ते माणसानेच निर्माण केले आणि आता त्यातूनच सगळीकडे प्रश्न-भांडणे चालली आहेत. अशा धर्मामधून परमेश्वर कसा मिळणार?

म्हणून तुम्ही कुठल्याही पारंपारिक धर्माच्या बंधनात अडकू नका. मी साधारण पाहते की उदा. एखादा सहजयोगी ख्रिश्चन

असल तर त्याच्यावर ख्रिश्चन धर्माचा पगडा अजून असल्याचे दिसून येते. तसाच ज्यू माणूसही दिसून येतो. मग सहजयोगामधे येण्याचा फायदा काय? त्यांनी आपले लक्ष आंतमधे घातले तर त्यांनाच कळून येईल. तुम्ही स्वतःलाच आपल्यामधे काय कमी आहे म्हणून गुरु बनलो नाही हे विचारुन पहा गुरुच्या यशाचे गमक असे आहे की तो काळाचे बंधन पाळत नाही. प्रत्येक क्षण हा त्याला पवित्र वाटतो. कुणाला उशीर झाला किंवा कुणी लवकर आला तरी त्याचे काही बिघडत नाही. कारण काळ म्हणजे घड्याळ. मानवनिर्मित आहे. तीनशे वर्षांपूर्वी घड्याळ हा प्रकारच नव्हता आणि कुणीही वेळेबद्दल आग्रह धरत नव्हते. म्हणजे गुरु हा काळाच्या पलीकडे असतो- कालातीत असतो. तसाच तो गुणातीतही असतो, म्हणजे डाव्या, उजव्या किंवा मध्यम मार्गाचा नसतो. त्याच्या गुणांच्या पलीकडचा असतो. तो जिथे असतो तिथे परमेश्वरी प्रकाश असतो. काही चांगले घडले तर ते या प्रकाशाने केले असे म्हणतो. काही वाईट घडले तर त्या प्रकाशाच्या मनात ते तसेच व्हावे असे म्हणतो. म्हणजे सर्व काही तो त्या प्रकाशावर सोपवतो. उदा. एखादा उजव्या बाजूचा अहंकारी मनुष्य असला तर म्हणेल "मला हे पाहिजे होते पण तसे झाले नाही." तसेच डाव्या बाजूचा मनुष्य म्हणेल, "माझ्या बाबतीत झाले याचे मला वाईट वाटते. तसे व्हायला नको होते" तर मध्यममार्गी म्हणेल "माझ्या व्हायब्रेशन्सवरून मल हे का समजले नाही?" जो खरा गुरू असतो तो सर्व घटनांकडे साक्षीरुपाने बघत असतो. त्याला सर्व काही खेळच वाटतो. त्यातून त्याला अमूक योग्य आहे, अमुक चुकीचे आहे यांचे ज्ञान मिळते. जे घडते ते क्षणिक असते व त्याचा त्याच्या मनावर काही परिणाम होत नाही. म्हणजेच तो गुणांच्या पलीकडे राहतो. तो कुठेही राहील, कुठेही जेवण करेल, कुठेही झोपेल. मोटरगाडी काय व बैलगाडी काय त्याला दोन्ही सारखेच. त्याचा मानसन्मान केला नाही किंवा साधा हार घातला तरी त्याला दोन्ही सारखेच. त्याच्या व्यक्तिमत्वावर काही परिणाम होत नसतो. त्याला तुम्ही काही द्या अगर काही देऊ नका, फरक पडत नाही. कारण तो स्वतःकडे दुसऱ्यांच्या डोळ्यांतून नाही तर स्वतःच्याच दृष्टीने पाहतो. आणि स्वतःच्याच आनंदात मस्त असतो.

याशिवाय सहजयोगातील गुरु सर्वांना सामावून घेणारा असला पाहिजे. लोकांमधे साधारण दोन प्रकारच्या प्रवृत्ति दिसतात. एक संबधांची तोड-मोड करण्याची प्रवृत्ति, हे फार सोपे काम आहे, सतत तक्रारी करून संबंध बिघडवायचे; दुसरी प्रवृत्ति लोकांना एकत्र जोडण्याची, हळुवारपणे. मृदु भाषा वापरत लोकांमधे दृढ नात्याचे संबंध जुळवायचे. त्यासाठी क्षमाच करत राहण्याची जरूरी नाही. ते आपोआप नकळत घडून येते आणि अशा गुरुभोवती लोक जमतात.

अमेरिकेत इतके थोडे सहजयोगी झाले याचे मला आश्चर्य वाटते. त्यांनी सांगितले की ५०,००० डॉलर्स खर्च केले तेव्हा फक्त ५० लोक सहजयोगात आले. पण त्यांना हे करावेच लागले कारण तिकडे साधक खूप असले तरी ते कुठल्या ना कुठल्या मार्गांत हरवलेले आहेत. पण अशी भटकंती करूनच ते सरळ मार्गावर येणार आहेत. आणि तसेच झाले. नुकत्याच तिथे माझ्या कार्यक्रमाला चार हजार लोक जमले. असे आजपर्यंत घडले नव्हते. पुष्कळ जण उतरले नाहीत पण सर्वांना अनुभूति मिळाली. आत अमेरिकेत कार्य चालू झाले आहे म्हणून तिथल्या लोकांना (सहजयोग्यांना) आपल्या घरातले व आजूबाजूच्या लोकांपर्यंत न थांबता त्यांनी जोमाने सगळीकडे कार्य करायला हवे. मी तर म्हणेन की इतर देशांतील योग्यांनीही अमेरिकेत जाऊन कार्य करावे. कदाचित या बाहेरच्या सहजयोग्यांचा तिथल्य लोकांवर जास्त प्रभाव पडेल. तिथे अगुरू मंडळी खूप आहेत. आणि त्यांचे तिथे चांगले बस्तान जमले आहे. त्यांच्यापासून लोकांना बरेच त्रास झाले. पैसे खर्च झाले तरीही ते त्यांना चिकटून आहेत. म्हणजे त्यांच्यात मुळातच समज कमी आहे.

मी एक पुस्तक लिहिले आहे आणि ते कदाचित त्यांना मिळेल. तुम्ही लोकांनीही तुमचे अनुभव लिहून ते प्रसिद्ध करा. त्याचाही त्यांना उपयोग होण्यासारखा आहे. जे काही लिहाल त्यामधे तुमची सहजयोगी म्हणून केवढी योग्यता आहे ती दिसून आली पाहिजे. तुम्ही जे लिहाल त्याने वाचणारे दुखावले जाणार नाही एवढी काळजी घ्या, सुधारणा करण्यासाठी त्यांना मदत होईल असे लिहा. गुरुने आपल्या स्वतःबद्दल भलत्या कल्पना बाळगू नयेत. तो गरीब असेल वा श्रीमंत असेल पण त्याचे भान तो ठेवतनाही. कबीर पहा, रामदास पहा, ते काही मोठ्या कुळातले नव्हते, तसेच नामदेव. पण या सर्वांनी किती सुंदर काव्य केले? त्यांना हे कसे जमले? तर ते अध्यात्मिकतेच्या साम्राज्यात रहात होते म्हणून. तुमच्यापैकी काही जण सुंदर कविता लिहितात हे मला ठाऊक आहे. पण काही चांगले कवि कधी कधी हट्टी व अभिमानी असतात. मग त्यांना ही प्रतिभा कोठून मिळते? म्हणून तुमचे व्यक्तिमत्व असे बनले पाहिजे की तुम्हाला पाहिल्याबरोबर लोक म्हणतील, "हा खरा गुरु आहे" त्यासाठी तुम्हाला बायका-मुलांपासून दूर जायला नको, कसलाही त्याग करायला नको. पण अहंकार मात्र पार सोडून द्यायला हवा. सामूहिकतेत अहंकारही त्याज्य आहे. कधी कधी लोक आपला

सूक्ष्म अहंकार गुप्तपणे जोपासतात, पण त्यालाही एखादा रोग घालवतो तसा घालवला पाहिजे.

आजच्या गुरुपुजेच्या दिवशी आणखी एक सांगायचे म्हणजे तुमच्यापैकी प्रत्येकाला खूप मेहनत करायची आहे. सर्वांत महत्वाचे म्हणजे तुम्ही तुमचे आयुष्य व वेळ सहजयोगासाठी किती देता हे पहा. तरच तुम्हाला गुरूपद प्राप्त होणार. माझेच पहा, मलाही घर आहे. संसार आहे पण तरीही मी सारा वेळ सहजयोग, सहजयोगी आणि सर्व मानवजातीचा उद्धार यालाच देत आले. तेही सर्व जगभर प्रवास करून तुमचे क्षितिज, तुमची प्रगल्भता तितकीच विस्तीर्ण झाली पाहिजे म्हणजे तुमच्यासमोरचे सर्व प्रश्न, सर्व अडचणी दूर होतील. ही स्थिती तुम्ही एकदा मिळवली की तुम्ही काय काय करू शकता याचे तुमचे तुम्हालाच आश्चर्य वाटेल.

तुमच्यामधे असे अनेक सहजयोगी या स्थितीला आलेले मला माहीत आहे. त्यांच्यावर माझे प्रेम आहे व तेही माझ्यावर खूप प्रेम करतात. पण गुरु बनल्यावर आपण आता गुरू झालो आहोत ही भावना होणार नाही. याची तुम्ही काळजी घेतली पाहिजे. कधी ते मनातही येऊ देऊ नका. तसे झाले तर मग अहंकार पुन्हा वर येईल. म्हणून सतत भान ठेवा की "मी काही करत नाही, श्री माताजींच्या हृदयातील मी एक पेशी आहे." अशी नम्रता तुमच्यामधे रूजली की तुमच्या साऱ्या अडचणी दूर होतील आणि कार्य घडून येईल, तुमच्या व्यक्तिमत्तवावर लोकांच्या नजरा खिळून राहतील. एरवी तुम्ही कितीही धडपडलात तरी कार्य होणार नाही. तुम्ही साऱ्या मानवजातीला सहजयोग द्यायचा आहे. गुरुबद्दल आणखी खूप काही सांगण्यासारखे आहे पण आता ते पुढच्या गुरूपुजेच्या वेळेस सांगेन.

सर्वांना अनंत आशीर्वाद.

चंदीगडमधील सहजयोग्यांनी कॉलेजमधील तरूण विद्यार्थ्यांमधे कुतूहल आणि ईश्वरभक्ती जागवण्याच्या उद्देशाने एक पत्रक तयार केले. त्यावर श्री माताजींचा एक फोटोसुद्धा आहे. ही पत्रके वाटून कॉलेज व विद्यापीठांमधे त्यांनी सहजयोगाचे बरेच कार्यक्रम केले. त्या पत्रकाचा सारांशः-

आजकालचे तरूण विद्यार्थी बऱ्याच ताण-तणावाच्या वातावरणाने भारून गेले आहेत. त्यांना जीवघेण्या स्पर्धेला तोंड द्यावे लागत असल्यामुळे ते सतत काळजी व तणावाखाली असतात. "खूप अभ्यास करणे प्रत्येक बाबतीत वरच्या नंबरवर येणे. आपले भविष्य उज्ज्वल बनवणे. नोकरीसाठी खूप खटपट करणे, "अशा समस्यांना व परिस्थितीला त्यांना तोंड द्यावे लागते. जसजशी ही परिस्थिती जास्त बिकट बनत जाते त्याचे संतुलन विघडत जाते आणि हा मानसिक दबाव वाढत जातो. त्याचा परिणाम सत्यपरिस्थितीचे योग्य आकलन न होण्यामध्ये होऊन कधीकधी नैराश्य व विफलता त्याच्या पदरी येण्याची शक्यता असते व चित्र एकूणच भरकटलेल्या स्थितीला येते. अशा विचलित मनःस्थितीमध्ये वर्गामध्ये शिकवले जाणाऱ्या विषयांचे संग्रहण होत नाही व वाचलेल्या विषयांत लक्ष लागत नाही. ही परिस्थिती आटोक्याबाहेर गेली की दारू, नशा, मादक द्रव्य-सेवन इ, अनिष्ट मार्गाकडे जाण्याची प्रवृत्ती वळावते.

आपण भोवतालची अशी परिस्थिती बदलू शकत नाही म्हणून आपल्यामध्येच आंतरिक बदल घडवण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. आपल्यामध्ये सुप्त अवस्थेमध्ये असलेली परमेश्वरी शक्ती जागृत करून सर्वव्यापी परमेश्वरी शक्तीबरोबर तिचा योग घडवणारी सूक्ष्म व्यवस्था प्रत्येकाजवळ जन्मतःच उपलब्ध आहे. यामुळे होणारे फायदे

– लीव्हरला आराम मिळून मनावर नियंत्रण येते.
– चित्त शांत झाल्यामुळे अभ्यासाच्या विषयांचे आकलन जास्त चांगले होते.
– स्मृति जास्त सक्षम होऊन संग्रहण शक्ति वृद्धिगंत होते.
– शारीरीक आरोग्य सुधारते. डोकेदुखी, नैराश्य, आत्मविश्वासाचा अभाव, अस्थिरपणा इ. विकार पळून जातात.
– सृजनशक्ती वाढते व व्यक्तिमत्त्व कार्यप्रवीण, सुजाण, व सकारात्मक बनते.
– आपल्याला आंतरिक शांति मिळून स्वतःचा आनंद मिळतो. त्यासाठी बाहेर कुठे करमणुकीसाठी जाण्याची गरज भासत नाही.

(ब्लॉसम टाईम : फेब्रुवारी ९८)

# महाकाली पूजा

## प.पू. श्री माताजी निर्मला देवींचे भाषण (सारांश)

फ्रान्स : १९९०

बेल्जियममधे आपण भैरव-पूजा घेतली. आता आपण इथे फ्रान्समधे महाकाली पूजा घेत आहोत. कालच्या रात्रीचा अनुभव हे महाकालीचे कार्य होते. महाकालीचे दोन अगदी टोकाचे गुणधर्म आहेत. एका बाजूला ती खूप आनंदी व उत्साहपूर्ण असते. आनंदी असणे हा तीचा मुळ अंगभूतगुण आहे. काल रात्री फ्रान्स मधील मध्यवयीन स्त्रिया हसताना व आनंदी असलेल्या पाहून तुम्ही आश्चर्य चकीत झाला असाल. त्यांना पूर्वी मी कधी इतक्या हसताना पाहिले नव्हते. ही महाकालीची शक्ति आहे, जी तुम्हाला आत्मसाक्षात्कारानंतर मिळते व ती तुम्हाला नेहमी आनंदी ठेवते. आता पुजेत जी महाकालीचे नावे वाचणार आहेत त्यावरून तुमच्या लक्षात येईल की तिचया या गुणांचे व शक्तिचे सहजयोगांत कसे प्रकटीकरण होते, व तुम्ही सर्व सहजयोगी आनंदाच्या सागरात कसे डुंबता.

सुरुवातीला तुम्हाला एक गोष्ट सांगायची आहे की, तुम्ही महाकालीची पूजा करत असताना मनातून तुम्हाला अगदी आनंद अनुभवाला यायला हवा तसेच इतर सहजयोग्यांना बघुनही तुम्ही आनंदीत व्हायला हवेत. जर तुम्हाला असा आनंद वाटत नसेल तर तुम्ही सहजयोगांत परिपक्व झालेले नाहीत. तुम्हाला काहीतरी त्रास असणार- मग तो त्रास तुमच्या कुटुंबियांचा, मुलाबाळांचा किंवा देशाचा असेल, म्हणजेच कुठल्यातरी पूर्वसंस्कारामुळे तुम्हाला हा खरा आनंद मिळत नसेल. सहजयोगांत तुमची वाढ होण्यासाठी महत्त्वाचे म्हणजे तुम्ही कलेक्टिव असले पाहिजे. आश्रमात राहण्यांनीसुद्धा हे लक्षात ठेवले पाहिजे. जर तुम्ही कलेक्टिव्ह नसाल तर हळूहळू तुम्ही सहजयोगाच्या बाहेर फेकले जाता. महाकाली शक्तीचे सात धागे आहेत असे समजा. हे सात धागे तुम्हाला कलेक्टिव्ह सब्-कॉन्शस मधे फेकतात, आणि जेव्हा तुम्ही कलेक्टिव्हीटी पासून दूर-दूर जाऊ लागता तेव्हा स्वतः महाकाली शक्ति तुम्हाला सहजयोगाच्या बाहेर फेकते. आणि तुम्ही हळू हळू सबकॉन्शिस मधे दिसेनासे होता, आणि सर्व प्रकारचे प्रश्न सुरू होतात. प्रत्येक देशांत हेच घडत असताना मला दिसत आहे, की लोक कलेक्टिव्ह मेडिटेशनला येत नाहीत. फ्रान्स मधेही हेच घडते आहे. मला वाटते की जे लोक सहजयोगांत प्रगती करणार नाहीत ते बाहेर फेकले जातात. ज्याप्रमाणे महाकाली शक्तिला दोन बाजू आहेत त्याचप्रमाणे सहजयोगालाही दोन बाजू आहेत. महाकाली शक्ति अत्यंत प्रेमळ, आनंदी असते किंवा दुसऱ्या बाजूला तिचे रूप अत्यंत क्रूर व राक्षसी असते. ती राक्षस व तत्सम लोकांचाही स्वामिनी असते, व त्या मुळेच त्यांचे तुमच्यावर कार्य सुरु होते.

जेव्हा तुम्ही डाव्या बाजूला फेकले जाता त्या वेळी, तुमच्यात डाव्या बाजूच्या समस्या सुरु होतात. मुलाधाराच्या समस्या सर्वात वाईट. मलायटीस वगैरेचाही त्रास संभवतो. तसेच आणखी स्नायूंची अनैसर्गिक वाढ हाही त्रास त्यातच येतो. त्यामुळे हे टाळले पाहिजे. जेव्हा तुम्ही कलेक्टिव्ह नसता त्या वेळी किंवा तुम्हाला सामूहिकतेचा अर्थ किंवा किमत कळत नाही आणि तुम्ही कलेक्टिविटीच्या बाहेर असता त्या वेळी सर्व निगेटीव्ह शक्ति एकत्र येतात, म्हणून कोणताही सामूहिक कार्यक्रम टाळता कामा नये, ही दक्षता घेतली पाहिजे. दुसरे म्हणजे महाकाली शक्ती तुम्हाला एकमेकांबद्दल प्रेमाची भावना देते. जसे पति-पत्नि यांच्यातील संबंध. जर दोघांचे एकमेकाशी नाते ठीक असेल तर महाकाली शक्ति पण ठिक, दोघातील एकात जरी दोष निर्माण झाला तरी महाकाली शक्ती त्याला बाहेर फेकते तसेच त्याच्याशी संबधीत दुसऱ्या व्यक्तिलाही (पति किंवा पत्नि) बाहेर फेकते. म्हणून प्रेमात पडणे हा प्रकार योग्य नाही. पण प्रेमात पडणे हा शब्द प्रयोग बरोबर आहे कारण तुम्ही खरोखर प्रेमात पडता म्हणजे तुमची पातळी खालावते, ही महकाली शक्तिचीच "माया" होय. तुम्हाला भरळ पडते, तुमचा अहंकार सुखावतो व आपण जी पत्निची कल्पना केली तीच ही व्यक्ति होय वगैरे वगैरे वाटू लागते. आणि या मधे दोन प्रकारच्या शक्यता असतात. एक म्हणजे तुम्ही एकमेकांची स्तुती करता कीं स्वतःचे व्यक्तिमत्त्व हरवून बसता. दुसरी गंभीर शक्यता अशी कीं तुम्हा दोघामधे इतकी दरी निर्माण होते कीं तुम्ही एकमेकांचा पराकोटीचा द्वेष करु लागता, व परत कधीही एकत्र येत नाही. (लव्ह ॲण्ड हेट रिलेशन) हे सर्व महाकालीच्या शक्तिच्या टोकाच्या दोन गुणधर्ममुळे होते. (मायेमुळे) (एका टोकाला अत्यंत प्रेम व आनंद, मृदुता व दुसऱ्या टोकाला क्रौर्य व विनाश) म्हणून या

देशामधे लोक प्रेमात पडल्याशिवाय लग्न करत नाहीत, व ते सर्व मर्यादांचे उल्लंघन करतात. जसे विवाहित व्यक्तिशी विवाह, पहिला घटस्फोट न होताच तसेच त्या व्यक्तिशी लग्न करणे, वृद्ध पुरुषाने तरूण मुलीशी लग्न करणे किंवा वृद्ध स्त्रीने तरुणाबरोबर लग्न करणे, वगैरे वगैरे. मुर्खपणाच्या गोष्टी करतात, ते टिकाव नसते, त्यात कोणतीही मर्यादा नसते, लग्न करणे म्हणजेच तुमच्या वर्तनाला मर्यादा असणे, जेथे मर्यादा नाही तेथे महाकाली शक्ति कार्यान्वित होते.

प्रथम तुम्ही कलेक्टिव असलेच पाहिजे व प्रत्येकाने सर्व कलेक्टिव (सामुहिक) कार्यक्रमांना हजर राहिले पाहिजे. तुम्ही सुचना करु शकता पण स्वतः काही सांगू नका. माझ्या भाषणाच्या टेप्स् लावा व ध्यान धारणा करा. टेप्स् सुरू होण्यापूर्वी कोणतीही चर्चा करू नका. भारतात सहजयोग लोक टेप लावतात व ध्यान करतात नंतर आरती करून मग केंद्र संपते. कोणत्याही प्रश्नांवर चर्चा करत नाहीत, तर ते टेप अथवा व्हिडीओ टेप लावण्यापूर्वी चर्चा करतात, मागच्या प्रोग्रॅमबद्दल ते अग... चर्चा करतात. तुम्ही इथे काही लग्न करायला किंवा प्रेमात पडायला आलेला नाहीत. किंवा ही आपली पत्नि म्हणून एखाद्या स्त्रिच्या मागे किंवा हा आपला पति म्हणून एखाद्या पुरुषाच्या मागे धावण्यासाठी इथे आलेले नाहीत, अनेक पूर्व जन्मात तुम्हाला किती तरी पति-पत्नि होतेच. तर तुम्ही इथे का आलात? तर ते तुमच्या स्वतःच्या उत्थानासाठी, म्हणून तुमच्या मनोव्यापारावर तुम्ही बारीक लक्ष ठेवले पाहिजे. पण असे काहींच्या बाबतीत घडलेले आहे. हा मूर्खपणा आहे. सावध व्हा! तर तुम्ही लक्षात ठेवा, इथे आपण फक्त सुखी वैवाहिक जीवनासाठी आलेलो (तुमचे वैवाहिक जीवन सुखाचे जावो असे जर मी म्हटले तर ते चुकीचे नाही तुमचे वैवाहिक आयुष्य सुखाचेच जायला हवे पण ते तुमच्या उत्थानात अडथळा बनता कामा नये) नाही तर ती फक्त एक पायरी आहे जी तुम्हाला तुमच्या उत्थानाच्या खऱ्या मार्गापासून दूर नेईल तरी सावध रहा. आपण लक्षात घेतले पाहिजे कीं अबोधिता म्हणजे पवित्रता. वैचारिक पावित्र्य. पावित्र्य हे -युरोपियन, जास्त करून फ्रेंच लोकांनी समजून घ्यायाला हवे. त्याच्या समाजव्यवस्थेत त्याची कमतरता आहे. समाजात पावित्र्य येण्यासाठी कौटुंबिक पावित्र्य हवे. एवढेच नव्हे तर परस्परातील संबंध पवित्र हवेत. मला असे कोणी सांगितले की गणपती-पुळ्याला कोणी प्रेमात पडले. तुम्ही तीर्थयात्रेला आला आहात. साडी खरेदीला आला नाहीत. गणपती पुळयाला तुम्ही कशासाठी येता? तर तुमच्या स्वतःच्या उत्थानासाठी येता. तीर्थयात्रेला येऊन प्रेमात पडण्यासाठी नाही. माझ्या तरी ऐकिवात असे नाही कि तीर्थयात्रेला येऊन कोणी प्रेमात पडले, व लग्न केले. सहजयोगात आल्यावर प्रेमात पडण्याचे हे भूत सोडायला हवे. शुद्धता म्हणजे पवित्रता- अबोधिता म्हणजे पवित्रता. फक्त शारिरिक नव्हे तर मानसिक शुद्धता देखील हवी. जर मनःशुद्धी नसेल तर तुमचे उत्थान होणे कठीण. पश्चिमेकडे ही शारिरिक पेक्षा मानसिक अपवित्रता जास्त आहे. त्यामुळे मेंदूत बिघाड झालेला आहे. काल्पनिक गोष्टींच्या मागे लागणे हे फार धोक्याचे आहे. वास्तवापासून दूर जावयाचे हे मूर्खपणाचे आहे. ह्याचा अर्थ तुम्ही रुक्ष व्हावे असे नाही, किंवा तुमच्या जबाबदाऱ्या टाळाव्या असे नाही. जसे झाडामधे अन्न रस वाहतो तो झाडाच्या प्रत्येक भागाचे सारख्या प्रमाणांत अलगपणे पोषण करतो, व त्याची निगा राखतो त्याचप्रमाणे आई, बाप, बहिण, भाऊ या नात्यांचे आहे. बाप हा बाप, आई ही आई. भाऊ हा भाऊ व बहिण ही बहिण आहे. बहिण-भाऊ हे कधीही पति-पत्नि होऊ शकणार नाहीत.कसे शक्य आहे? हा वैचारिक संभ्रम होय! त्यामुळे अनेक समस्या निर्माण होतात. जेव्हा झाडाचा जीवनरस सर्व भागांचे पोषण करून नंतर तो परत खाली येतो, तो कशालाही चिकटत नाही (कोणत्याही भागाबद्दल जिव्हाळा ठेवत नाही) जसे बायकोबद्दल संसारात जिव्हाळा, कौटुंबिक जिव्हाळा आवश्यकच आहे, तुम्ही कुटुंबाची काळजी घ्यायला हवी पण याचा अर्थ असा नाही कीं त्यासाठी तुम्ही नुकसान करून घ्यावे किंवा त्यामुळे तुमचे उत्थान संपुष्टात यावे. तुम्ही सर्वसाधारण माणसासारखे नाहीत. तुम्ही संत आहात आणि संताचे एकच मुख्य ध्येय असते ते म्हणजे उत्थान त्यांच्यासाठी कौटुंबिक आयुष्य किंवा भौतिक गोष्टी, किंवा मुले बाळे महत्वाची नाहीत. फक्त उत्थान हेच ध्येय असले पाहिजे. एकदा का तुमचे उत्थान झाले की त्या बरोबर सर्व गोष्टींचेही उत्थान होते.

आता पवित्रता समजून घेणे महत्त्वाचे आहे उत्थानामुळे ती तुमच्यात सहजच येते हे एक व्हिशससर्कल आहे. प्रथम तुम्ही आत्मसाक्षात्कार घेता आणि तुम्हाला माहीत आहे की कुंडलिनी शक्ती म्हणजेच महाकाली शक्ति आहे. ती अनादी आहे. ती कुमारे स्वरुपात आहे. ती शुद्धतेचे कार्य करते, व तीचे सहजसुंदरतेने प्रकटीकरण होते. श्री गणेश हे तिथेच बसलेले आहेत, आणि मुलाधारातच ते बसले आहेत, आपल्या आईच्या रक्षणासाठी. त्याच्या परवानगी शिवाय आईचे (कुंडलिनीचे) उत्थान होत नाही, आणि ते त्यांचे इतर कार्य थांबवितात. याचेच उदाहरण म्हणजे तुम्हाला माहितच आहे की मी इथे तासन् तास बसते– मला बाथरुमला सुद्धा उठावे

लागत नाही. कारण श्री गणेश त्यांचे सर्व कार्य थांबवतात. त्यांना फक्त उत्थानाचीच काळजी असते प्रत्येक चक्रावर तुमची शुद्धता ते तपासतात व नंतर कुंडलिनी ती चक्रे स्वच्छ करते. पण जेव्हा ती मानसिक पातळीवर येते, तेव्हा तेथे हास्यास्पद कल्पना आढळतात. जसे रोमान्स वगैरे. एक दिवशी मला एक मुलगी भेटली तिला तिच्या पतिशी प्रेम करण्याची समस्या निर्माण झाली होती. ती लग्नानंतर - लग्नाआधी ठिक होते. तिला मी रोमान्स विषयीची पुस्तकं वाच असे सांगितले- तेव्हा ती म्हणाली- मला असे काही माहीत नाही. तेव्हा मी प्रोफेसरना सांगितले तर ते म्हणाले असे पुस्तक नाही. सहजयोगांत लग्नानंतरच रोमान्स सुरू होतो. पण मर्यादने- सहजयोग किंवा तुमच्या उत्थानाच्या बदल्यात नव्हे. पश्चिमेकडे या सर्व कल्पना आहेत, पूर्व संस्कार आहेत. आम्ही व्हायब्रेशन्स पाहून लग्नासाठी वधू-वरांची निवड करतो. व्हायब्रेशन्सवर म्हणजे महाकालीचेच कार्य आहे. आणि येवढे करून सुद्धा काही लग्न अयशस्वी ठरतात. कारण त्यांना (वधू-वरांना ) या लग्नाचा हेतूच कळलेला नसतो. महाकाली म्हणजे मूर्तिमंत पावित्र्य. ती शुद्धता तुमच्यात बाणली नाही तर तुम्ही सहजयोगी असू शकत नाही. मन हे पूर्व संस्कारीत असेत. आपल्यापेक्षा बरेच वेळा लहान मुले ही चांगली कारण ती पूर्व संस्कार रहित असतात. तुम्हा सर्वात पावित्र्य आले तर बरोचसे प्रश्न टाळले जातील. इतर समाजात मी वावरते तेव्हा मला असे दिसते की त्या समाजात जास्तीत जास्त व्यभिचार बोकाळला आहे. ते हास्यास्पद आहे, तसेच धोक्याचेही. उदाहरणार्थ- एखादा पुरुष ऑफीसातून घरी येतो तेव्हा त्याची बायके- दुसऱ्या कोणाबरोबर पळून गेलेली असते; किंवा एखादा पुरुष कामाला म्हणून बाहेर जातो व दुसऱ्या एखाद्या स्त्रिबरोबर पळून जातो.

शुद्धता ही तुम्हाला स्थिती देते. दृढता देते. स्थिरता देते. रोमँटिक आयुष्यापेक्षा पावित्र्यात दृढता/ स्थिरता असल्याशिवाय तुमची प्रगती होणार नाही. समजा, विमान बनवायचे असेल तर त्याचे नियोजन करून आराखड्याप्रमाणे त्याची बांधणी करावयास पाहिजे म्हणजे ते आकाशात उडाल्यानंतर त्याचे काही भाग प्रवाश्यासहित त्यातून सुटून जाणार नाहीत. ह्याचप्रमाणे आपले उत्थान होत असताना श्री गणेश हेच कार्य करित असतात. त्यांचा आपल्याकडून अवमान झाला, किंवा त्याच्याकडे दुर्लक्ष झाले किंवा आपण चुकीचे वागलो तरी ते त्यांचे कार्य करीतच राहतात. त्यामुळे इतक्या लोकांना आत्मसाक्षात्कार मिळतो आहे. पण त्या करता आपण काय करतो? आपण साधे सामूहिक (कलेक्टिव्ह) सुद्धा राहू शकत नाही? श्री गणेश हे अत्यंत सामूहिक आहेत, इतके की, समजा एखादा श्रीकृष्णाची भक्ति करत असेल तर त्यांच्या हृदय चक्रावर कॅच येईल. का? कारण त्याने शिवाची पण भक्ती केली पाहिजे. ते इतके कलेक्टिव व एकमेकाशी जोडलेले आहेत, तुम्ही पण तसेच कलेक्टिव व जोडलेले पाहिजेत. जेव्हा कलेक्टिव व्हाल त्या वेळी तुमच्यातील मूर्खपणाच्या सर्व गोष्टी गळून पडतील. तुम्ही या मूर्खपणाच्या गोष्टी सोडत नाही म्हणून तुम्ही सामूहिक होत नाही, किंवा त्या गोष्टी सोडायला तुम्ही घाबरत आहात. आपला मुख्य हेतू काय आहे ते जाणून घेतले पाहिजे. तो हेतू म्हणजे आपले स्वतःचे उत्थान, आणि महाकाली शक्ति आपल्यासाठी काय करते ते जाणून घेतले पाहिजे. ती आपल्याला आपल्या कुंडलिनीचे जागरण करून आत्मसाक्षात्कार मिळवून देते. ती शुद्धता देते. ती सर्व शक्त्या प्रदान करते. ती सर्वकाळ तुमचे रक्षण करते आणि तुम्हाला आनंदाची प्राप्ती होते. तुम्ही तीच्यासाठी काय करता? तर तीची फक्त एक इच्छा आहे की आपल्या मुलांनी मानसिक दौर्बल्यातून स्त्री-पुरुषांनी परस्परांकडे आकर्षित होणं अशा प्रकारच्या निम्न स्तराचे न होता संत व्हावे, त्याच्या मधे संतासारखे सद्‌गुण यावेत. सहस्त्रार जर खराब असेल/ झाले तर सहज योगाचे कार्य कसे होणार? सहस्त्राराचेच सर्व कार्य आहे. कारण आम्हाला तुमच्याकडून जगाचे परिवर्तन घडवून आणायचे आहे म्हणून तुमच्यात पावित्र्याचे दर्शन घडले पाहिजे. दुसरे कोणीही नाही तर सहजयोगीच हे कार्य (परिवर्तनाचे) करू शकतात.

आता औदार्याबद्दलच बघा. माझे शरीरही जनरस आहे. काल एक स्त्री माझ्याकडे आली, ती अजून खालच्याच मजल्यावर होती. तिचे लिव्हर खराब होते. त्यामुळे माझे लिव्हर स्पंदन करू लागले. तिने ड्रग्ज वगैरे घेतल्याने तिचे लिव्हर खूपच खराब झाले होते. तिचा त्रास माझ्याकडे आला. माझ्या लिव्हरने तक्रार न करता फक्त स्पदन सुरु केले त्या स्त्री साठी. ते किती जनरस आहेत. ते तुमची काळजी घेतात, तुमच्या मुलाबाळांची काळजी घेतात पण तुम्ही त्यांच्यासाठी (श्री गेणशांसाठी) काय करता? मी असे ऐकले आहे की, पोस्टर्स लावण्यासाठी बोलावले तर फार थोडे लोक पुढे येतात. ही एक प्रकारची कृतघ्नताच आहे.जेव्हा एखादा सामूहिका कार्यक्रम केला जातो त्यावेळी सर्व देव देवता हजर असतात. आश्चर्याची गोष्ट म्हणजे जुने सहजयोगीच नवीन सहजयोग्यापेक्षा अवघड आहेत. ते निकामी झालेत की काय?

ख्रिस्ताने म्हटलेच आहे की जे पाहिले ते शेवटचे. मला वाटते हे असेच होणार. त्यांना जुने असल्यामुळे एक प्रकारचा वृथा आत्मविश्वास निर्माण झाला आहे. एक प्रकारचा अहंकार त्यांच्यात आला आहे, कीं आम्ही सामूहिकतेत हजर-राहू किंवा नाही राहणार कारण आम्ही जुने आहोत. यामुळेच लंडनमधे भयंकर दुष्परिणाम दिसून येत आहेत. सावध रहा. ख्रिस्तानी स्पष्टपणे म्हटलेच आहे 'पहिले ते शेवटचे'! आणि त्यानुसार त्यातील काही लोक सहजयोगाबाहेर गेलले मी पाहिले आहेत. ते कसे बाहरे जातात याचे आश्चर्य वाटते, अतिमूर्खपणा. इटलीत एक सद्गृहस्थ , जुना सहजयोगी उठून उभा राहिला व म्हणाला " मी महा माताजी " आहे. मी सर्व काही करणार आहे. तेव्हा सर्वजण त्याचेकडे बघू लागले व म्हणाले कसे शक्य आहे. असे जर असेल तर आम्ही सर्व जण आश्रमातून बाहेर जातो, तूच सर्व बघ. तेव्हा तो म्हणाला मला ते मॅनेज करता येणार नाही म्हणून मीच आश्रमातून बाहेर जाणार आहे. तो आश्रम सोडून गेला, व एक स्त्रीकडे राहू लागला. तिने त्याचे माझ्या विरूद्धचे बोलणे ऐकले, तिला कॅन्सर झाला व त्यातच तिचा अंत झाला.

सामूहिकतेत जर तुम्ही असाल तर तुमचे प्रश्न किंवा दुसऱ्याचे श्रश्न आपोआपच बॅलंस होतात. व सुटतात. जर एखादे बोट तुटले तर ते निकामी होते किंवा नख तुटले तर ते निरूपयोी ठरते, ते मृत ठरते, त्याप्रमाणेच तुमच्या अध्यात्मिक जीवनाचा अंत होतो. (स्पिरिच्यूअल डेथ) नंतर ते (सहजयोगांबाहेर गेलेले ) परत येतात व म्हणतात श्री माताजी मी तीन वर्षे सहजयोगाच्या बाहरे होतो. मी कलेक्टिव्हीटित आलो नाही आणि मला असा असा त्रास झाला. मी सर्व जगाच्या सामूहिकतेचा विचार करते ते माझे स्वप्न आहे. आणि जर सहजयोगीच सामूहिक नसेल तर कोण सामूहिक असणार, कोण ते साकार करणार?

जे स्वतःला सहजयोगी म्हणवतात. त्यांनी सामूहिक असलेच पाहिजे. दुसरे म्हणजे औदार्याचा थोडा प्रश्न निर्माण झाला होता. लोकांबद्दल. तो एक महालक्ष्मीचा गुणधर्म आहे. तुम्ही दुसऱ्यांना व्हायब्रेशन देता त्यांची काळजी घेता तेव्हा जे औदार्य दाखवता तेव्हा महालक्ष्मी तत्त्व कार्यान्वित होते. आणि महालक्ष्मी ही कंजूष लोकांना संपत्ति देत नाही. त्यांच्याकडे बँकेत पैसा बराच असेल पण ते सुखी नसतात. तेव्हा सहजयोगाला जेव्हा गरज असेल तेव्हा लोकांनी पैसा दिला पाहिजे. मी पहिल्यापासून सहजयोगाला पुष्कळ पैसा पुरवत आले हे सुरवातीच्या लोकांना माहितच आहे. पण आता सहजयोग वाढला आहे. आणि आता तुमची जबाबदारी आहे की, तुम्ही सहजयोगाला पैसा दिला पाहिजे. नाहीतर कशासाठी तो तुम्ही खर्च करणार आहात? मी जो सहजयोगासाठी खर्च करते ते माझ्या कुंटुबियांना पुण्यकर्मच वाटते. आणि जर असे पुण्यकर्म केले तरच आपल्याला संपत्ति , आरोग्य व भरभराट मिळते. तुमच्याजवळ जर पुण्य नसेल तर तुम्हाला काही मिळणार नाही. ते मिळेल पण नाहिसे होईल. लोक जर उदार नसतील तर ते आश्चर्यकारी आहे. तुम्ही इतरांपेक्षा सुस्थितीत आहात हे माहित असून लोक उदार नाहीत. ईस्टर्न ब्लॉक मधील लोकांची स्थिती एवढी चांगली नाही. तुम्ही काहीतरी त्यांना भेटीदाखल पाठवू शकता. तुम्ही काहीतरी त्यांच्यासाठी करू शकता, अशा भौतिक वस्तुंना देखील प्रेमाची किंमत आहे. इथेही महाकाली शक्ति कार्य करते. भौतिक वस्तू ही प्रेमाचा आविष्कार करते. काही वेळा लोक मला प्रेमाने भेटवस्तू देतात. मी खरे म्हणजे काही घेत नाही. मला काही नको आहे. पण ते इतक्या प्रेमाने देतात. त्यात त्यांचे माझ्याबद्दलचे प्रेम दिसून येते. त्यांच्याबद्दलचे तुमचे प्रेम कसे व्यक्त करणार? कीं जे तुमच्यापासून खूप लांब आहेत. देण्याची सवय लावा. सहजयोगासाठी सुद्धा काही द्या आणि मग बघा की सामूहिकतेत किती आश्चर्यकारक गोष्टी घडतात. कारण, श्री भैरवनाथ श्री हनुमान, श्री गणेश ह्या देवता कार्य करतात. त्यांचे कार्य हे समांतरपणे चालू असते. त्यांच्यामधे विरोधाभास नसतो. मेळ असतो. ज्यावेळी हनुमानांना भैरवनाथांची गरज पडेल त्यावेळी भैरवनाथ हजर असतात. श्री गणेशांची गरज असेल तर श्रीगणेश भैरवनाथांबरोबर असतात. जेव्हा गरज असेल तेव्हा या तीनही देवता एकत्रित (सामूहिक) कार्य करतात. एकमेकांतील सामंजस्यामुळे ते एकत्रितपणे महान कार्य करू शकतात. हे लोकांच्या लक्षात येत नाही. जगामधे लोक सतत मरणाच्या छायेत असून देखील एकमेकांशी भांडत असतात. पूर्वी सैन्याला पगारही नव्हते. पण तरी युद्धात भाग घेऊन लढत असत. देशासाठी किंवा इतर गोष्टींसाठी ते एकमेकांना मदत करीत असत व कधी कधी लढताना मृत्यदेखील होत असे. आपण लक्षात घेतले पाहिजे कीं एखाद्याचा द्वेष करताना हे सर्व गुण प्रकर्षाने दिसून येतात मग एखाद्यावर प्रेग करत असताना या गुणांचा अविष्कार का होत नाही? हे सर्व श्री महाकालीचे गुण आहेत. ती युद्धकलेत पारंगत आहे. ती युद्धाला प्रवृत्त करते. कारण ती इच्छाशक्ती आहे. ती काहीतरी करण्याची इच्छा निर्माण करते. ती कार्यप्रवृत्त करते आणि महासरस्वती त्या कार्याला मदत करते. पण प्रथम इच्छा प्रबळ पाहिजे. सर्व जगाला बंधमुक्त करायचे आहे ही इच्छा माणसांमधे अत्यंत प्रबल पाहिजे. आपण पायाभूत महान लोक

आहोत. आपले सर्व व्यक्तिमत्व पूर्णपणें सहजयोगासाठी अर्पित आहे यापेक्षा महत्त्वाचे काही नाही. ही इच्छा अत्यंत प्रबळ व शुद्ध आहे. ते लोकांना आत्मसाक्षात्कार देतात व खरोखरी आनंदाचा सागर बनतात. जर गंगेचे निर्मळ पाणी मिळत असेल तर घाणेरडे पाणी का प्यावे? सहजोगासाठी आपण समर्पित झाल्यानंतर त्यातून मिळणारा निरानंद हा एकच असा आनंद आहे की त्यापुढे रोमान्स, वैवाहिक सुख, कोणत्याही प्रकारचा आनंद वगैरे सर्व व्यर्थ आहे. आपल्याला विविध चक्रांवर मिळणारे विविध आनंद ही श्री महाकालीची देणगी आहे.

आत्मसाक्षात्कार मिळाल्यानंतर तुम्हाला महत्वाचे असे जे काही मिळते ते म्हणजेच "निरानंद". "शुद्ध आनंद" त्या निरानंद मिळण्याच्या स्थितीला तुम्ही प्राप्त केले पाहिजे. जेव्हा त्या निरानंद स्थितीला तुम्ही प्राप्त करता त्यावेळी इतर आनंद तुच्छ वाटतात. भारतीयांना क्रिकेट फार आवडते. ते अगदी वेडे आहेत. जंगलात गेले तरी ते क्रिकेट कॉमेंट्री ऐकतील. ज्या ब्रिटीशांनी तो खेळ काढला त्यांनाही त्यात फारसा रस उरला नाही. परंतु भारतीय मात्र क्रिकटचे वेडे आहेत. याउलट ज्या लोकांना क्रिकेट अत्यंत आवडत असे त्यांची आवड आत्मसाक्षात्कारा-नंतर लोप पावली. त्यात त्यांना आनंद वाटेनासा झाला. जे लोक ७-८ वर्तमानपत्र रोज वाचत असत ते आता पेपर वाचत नाहीत. कारण तुमचे चित्त आता फक्त सहजयोगावर केंद्रित झाले आहे. त्यामुळे पूजा, सहजयोग्यांना भेटणे, यातच त्यांना आनंद येतो. लंडनमध्ये श्री गणेशाची पूजा होती, खूप पाऊस पडत होता, पूजेसाठी बांधलेल्या पेंडालमधून पाणी पाझरत होते. असे साऱ्या रात्रभर चालू होते. तरी सर्व सहजयोगी ते एन्जॉय करीत होते. कसली ही काळजी करीत नव्हते. कारण त्यांच्या मनाच्या शुद्धतेमुळे ते निरानंदात– मग्न होते. इतर चक्रांवरचा इतर आनंद तुम्ही घेऊ शकता. पण निरानंद मनाच्या शुद्ध अवस्थेतच मिळतो. ही मनाची शुद्धता कशी मिळेल? तर निर्विचार स्थितीतून ती मिळते. एखाद्या गोष्टीकडे विचार न करता बघणे (निरंजन पहाणे) यातून मनाची शुद्धता मिळते. त्यासाठी तुम्ही सामूहिक पाहिजे. जिथे जिथे सामूहिकता असेल तिथे मी आहेच. तुम्ही सर्वजण या कार्यक्रमाला हजर आहता यापेक्षा दुसरी आनंदाची गोष्ट नाही. तुम्हाला आश्चर्य वाटेल ऑस्ट्रेलियात प्रत्येक शहरात आपली सेंटर्स आहेत पण ते सर्वजण कलेक्टिविटीच्या सर्व कार्यक्रमांना हजर असतात. कारण त्यांना माहित आहे. सामूहिकता हा पोषकत्त्वाचा सागर आहे. ही फार साधी गोष्ट तुम्हाला करायची आहे पण भूतेही खूप कलेक्टीव असतात– खूपच! भूतेही बंधुत्त्वाच्या पातळीपर्यंत जाऊ शकतात.

फ्रान्समधील एक सहजयोगीनीची वृद्ध आई जवळजवळ वेडीच झाली होती. तिला कोणतीच गोष्ट नीट करता येत नसे. परंतु ती रोज सकाळी उठून नीटनेटका पोषाख करून चर्चमधे जात असे. जिथे मृत लोकांची थडगी होती. तिथे जाऊन प्रार्थना व गाणे म्हणून ती परत यायची व नंतर वेड्यासारखी वागत असे. तिच्या अंगावर धड कपडेही नसायचे. तिला फक्त रोज सकाळी चर्चमधे जाण्यसाठी व्यवस्थित पोषाख करण्याचे ठाऊक होते. म्हणून त्या सहजयोगीनीने तिला वृद्धाश्रमात ठेवले. तिथेही इतर सर्व वृद्ध तिच्याप्रमाणेच चर्चमधे जाण्यापुरतेच व्यवस्थित असत. यावरून भूतांची कलेक्टिविटी कशी असते ते दिसून येते. कारण भूतेही बंधुभाव राखतात. त्यांच्यात एकमेकात इतके आकर्षण असते की, एका (बाधिक) भूतीश व्यक्तिकडे दुसरी बाधिक व्यक्ति आकर्षिली जाते. हे आकर्षण हा महाकालीचा गुण आहे. दुसऱ्या कोणापेक्षा भूते मला जास्त ओळखतात. कारण त्यांना माझा भूतकाळ माहित आहे. कारण ते भूतकाळात आहेत. बाधिक लोकांना कोण बाधिक आहे हे बरोबर समजते. म्हणून पॉझिटिव्ह कलेक्टिव्हीटीची (सकारात्मक/विधायक सामुहिकता) आवश्यकता असते. पण जे पॉझिटिव्ह कलेक्टिव्हीटीत येत नाहीत ते बाधिक लोकांच्या कलेक्टिव्हीटीत हळूहळू ओढले जातात. महाकालीबद्दल आपण आज विचार करीत आहोत. तिला बाधिक लोकांबद्दलची पूर्ण माहिती आहे, कारण ती त्यांची देवताच आहे. ती भूतांची देखील देवता आहे. व ती त्यांचे सर्व कार्य बघते. जर सहजयोग्यांना भूतीश (बाधिक) व्हायचे असेल तर ती (महाकाली) काय करणार? मागच्या दाराने ते तिकडे त्या प्रांतात जाऊ शकतात. महाकाली शक्ति भूतांना सहजयोग्यांकडे येऊ देत नाही. कारण सहजयोग्यांनी तिकडे जाऊ नये अशी तिची इच्छा असते. या सर्व गोष्टी असूनही जगामधे अनेक देशात सहजयोगाची चंगली वाढ होत आहे. फ्रान्समधे काल महाकालीची ही आनंदशक्ति लोकांवर कशी कार्यन्वित झाली हे तुम्ही पाहिलेच आहे. सर्व फ्रेंच बायका इतक्या आनंदी दिसत होत्या. आणि तुम्हीच त्यांना मार्गदर्शन करू शकता. जर तुम्ही सर्व उच्च स्थितला पोचलात, जर तुम्ही सामूहिक व औदार्यपूर्ण झालात जर तुम्ही शुद्ध झालात तर तुम्ही त्यांना मार्गदर्शन कराल. आणि तसे तुम्ही झालेलेच आहात. भैरवाच्या सर्व गुणांसह जे महाकालीचा महाशिष्य आहे रात्रंदिवस विशेषतः रात्री जो कार्य करतो, राक्षसांचा संहार करतो. व असे परिणाम मिळवतो त्याच्यासहित तुम्हाला आशिर्वादीत करते.

परमेश्वराचे तुम्हाला अनंत आशीर्वाद.

# ध्यानाची आवश्यकता

## प.पू. श्री माताजी निर्मला देवींचे भाषण (सारांश)

दिल्ली आश्रम २७.११.९१

आज अनायासे आपण एकत्र जमलो आहोत म्हणून सहजयोगाबद्दल आपण जास्त समजून घेऊ या. सहजयोग हा साऱ्या मानवजातीच्या भल्यासाठी आहे आणि तुम्ही लोक त्याचे माध्यम आहात. तुमच्यावर अर्थातच खूप मोठी जबाबदारी आहे. आपण जर झाडाला किंवा दगडाला व्हायब्रेशन्स दिल्या तर त्या प्रवाहित होऊ शकत नाहीत, कार्यान्वित होऊ शकत नाहीत तर तुमच्याच श्रद्धेमधून व कार्यामधून त्या प्रवाहित होणार असतात. सहजमध्ये एक प्रकारचा दोष आहे तो म्हणजे तो सहजच प्राप्त होण्यासारखा आहे पण त्याला सांभाळणे तितकेच कठीण आहे. कारण आपण पोकळीत रहात नाही किंवा फक्त अध्यात्मिक वातावरणात रहात नाही तर तऱ्हेतऱ्हेच्या वातावरणात व लोकांमध्ये आपण राहतो. आपल्या स्वतःच्याही बऱ्याच उपाधि असतात आणि त्यांना आपण चिकटून असतो. म्हणून सहजयोगात आपण शुद्ध बनणे व ही शुद्धता आपल्या अंतरंगात रुजवणे हे कार्य आपल्याला करायचे आहे. शक्तीचे वाहक असणारे माध्यम शुद्ध हवेच. उदा. विजेची तार खराब असेल तर वीज प्रवाहित होणार नाही किंवा पाण्याच्या पाईपमध्ये कचरा असेल तर नळामधून पाणी येणार नाही. त्याचप्रमाणे चैतन्य पसरवणाऱ्या नसा शुद्ध असल्या पाहिजेत आणि ही जबाबदारी तुमची स्वतःची आहे. एरवी तुम्ही माझ्याकडे श्रद्धा, भक्ति मागत राहता पण ही मुख्य गोष्ट तुम्ही स्वतःच समजावून मिळवायची आहे.

पहिली गोष्ट म्हणजे नसा शुद्ध झाल्यावर तुम्हालाच आनंद मिळणार आहे. आपण काही कार्य करत आहोत हेही तुम्हाला जाणवणार नाही. जे काही कार्य कराल त्यात तुम्हाला यश मिळेल; सर्व काही सहज घडून येईल. सर्व जमून येईल, योग्य प्रकारचे लोक तुमच्याकडे येऊन तुम्हाला मदत करतील. इतके की तुम्हालाच आश्चर्य वाटेल की आपण कसे एका वरच्या स्तरावर येत आहोत. तुमच्यावर लक्ष्मीची कृपा होत असते, तुमचे सर्व प्रश्न सुटत जातात व तुम्ही उत्तरोत्तर प्रगल्भ होत राहता. पण हे सर्व एक प्रकारचे प्रलोभन आहे हे तुम्ही समजून घेतले पाहिजे. नुकतेच मी एका सहजयोग्याने घटस्फोट घेतला आणि त्यात त्याला बरेच पैसे मिळाल्याचे ऐकले, पण असे लोक एकदम इतके खाली ढकलले जातात की त्यांना पुन्हा वर उठवणे कठीण होते. म्हणून नाड्यांच्या स्वच्छतेकडे तुम्ही लक्ष द्यायला हवे. त्यासाठी सकाळचे ध्यान अवश्य आहे. सकाळचे ध्यान लागत नसेल तर आपल्यामध्ये कुठेतरी बिघाड झाला आहे, कसले तरी अशुद्ध विचार आपल्या मनात येत आहेत असे पक्के समजा व त्यामुळे कोणते चक्र खराब झाले आहे हे तापसून त्यावर उपाय केला पाहिजे व चक्रांना स्वच्छ केले पाहिजे. म्हणजेच आत्मपरीक्षण करून स्वतःकडे लक्षपूर्वक बघितले पाहिजे. हे सर्व तुमच्या हिताचे आहे म्हणून मी सांगत आहे. तुमच्यामध्ये आपल्याच सवयींमुळे भोवतालच्या वातावरणामुळे, इतर लोकांबरोबर संबंध येत असल्यामुळे बरेच वेळा दोष येतात आणि ते एखाद्या शत्रूसारखे तुमच्यामध्ये लपून बसतात आणि मधून मधून डोके वर काढतात. म्हणून स्वतःला कुठल्याही प्रकारे अपराधी न समजता ते दोष दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कमळ कसल्याही घाणेरड्या चिखलातून वर येते आणि उमलल्यावर आपला सुगंध सगळीकडे पसरवते. सहजयोग असाच आहे व तुम्ही त्यात कमळासारखे व्हायचे आहे. पण हे कमळ सुरभित होण्यासाठी थोडीशी मेहनत करायला हवी.

सकाळचे ध्यान हे स्वतःकडे पाहण्यासाठी आहे. माझ्यात काही दोष आहेत, माझा राग कमी झाला आहे का, माझ्या मनात मला हानिकारक असणारे विचार या इच्छा येतात का इ. गोष्टींकडे लक्ष देत गेल्यास कुठल्या चक्रामुळे हा त्रास होत आहे हे तुम्हाला समजेल व ते ठीक करण्याच्या मागे लागा. ते ठीक करून मग ध्यानात जा. आपले मन व चक्र दोन्ही आधी स्वच्छ ठेवा. स्वार्थ ठेवायचा असला तर आधी 'स्व'चा अर्थ जाणला पाहिजे. ध्यान लागत नाही याचा अर्थ अजून एकाग्रता मिळाली नाही. स्वतःशी आधी प्रामाणिक रहायला शिका. सहजयोगात आल्यावर मी पाहते की पुष्कळ लोकांचे आजार बरे झाले आहेत, त्यांना पुष्कळ लाभ झाला आहे. कुटुंबातील प्रश्न मिटले आहेत, सर्व काही ठीक झाले आहे. तरीसुद्धा कुठल्या ना कुठल्या कारणाने त्यांचे सहजध्यान होत नाही. सकाळी उठून जे ध्यान करत नाहीत त्यांनी सहजचे कितीही कार्य केले तरी ते गहनता मिळवू शकत नाहीत आणि गहनतेतच सगळा आनंद, समाधान, ऐश्वर्य आहे. ही गहनता मिळवण्यासाठीच सतत आत्मपरीक्षण करत राहून स्वतःमधले दोष जाणून ते काढून टाकले पाहिजेत. दुसऱ्यांच्या दोषांकडे आपली चटकन नजर जाते पण ते काम तुमचे नाही तर माझे काम आहे.

संध्याकाळच्या ध्यानामध्ये समर्पण महत्वाचे आहे. मी सहजयोगासाठी काय केले, शरीर-मन-बुद्धीने मी सहजयोगासाठी काय करतो इकडे बघा. म्हणजे एक प्रकारे सहजयोगाचा विचार करा. तसेच इतर लोक तुमच्यावर किती प्रेम करतात, तुम्हाला किती मदत करतात हे बघा म्हणजे तुमच्या मनातही प्रेम बहरेल. प्रेमाला जर काही निमित्त

लागले तर ते सहज-प्रेम नाही. सहज-प्रेम निर्व्याज असते आणि अशा प्रेमामधूनच मोठा आनंद मिळत असतो. दुसऱ्याचे दोष बघत बसला, तो किती वाईट आहे असा विचार करत बसला तर आनंद मिळत नाही. प्रेमाचे आंदोलन बघण्यात फार सुंदर भावना असते व ती प्रेरणादायी असते. त्याचे शब्दांनी वर्णन करणे अवघड आहे. पण त्याचे तेज चेहऱ्यावर येते, तुमच्या वागण्यात ते दिसते व वातावरणात त्याचा प्रभाव पडतो.

अशा तऱ्हेने दोन वेळचे ध्यान अवश्य केले पाहिजे. एखादे वेळेस जेवायला मिळाले नाही तरी काही बिघडत नाही, एखादे वेळेस बाहेर फिरायला जायला झाले नाही किंवा आराम मिळाला नाही तरी चालेल पण दोन वेळचे ध्यान हे सहजयोगात अवश्य केले पाहिजे. ध्यानामधूनच सर्व काही मिळणार आहे. सकाळचे ध्यान ज्ञानाचे आहे तर सायंकाळचे ध्यान भक्तीचे आहे. अशा ध्यानामध्ये तुम्ही स्थिरावलात की तुम्हाला कळेल की तुमची महानता केवढी आहे. सहजयोगात जे काही होणार आहे व होत आहे ते तुमच्या माध्यमातून होत आहे. तुम्ही नुसत्या श्रीमंतीकडे बघू नका, जे लोक महालात, चैनीत रहात आहेत ते काही कामाचे नाहीत. तसेच डरपोक लोकांकडून हे काम होण्यासारखे नाही. पूर्वीच्या काळी हजारोंमध्ये एखादा आत्मसाक्षात्कारी असायचा. त्यासाठी फार तपश्चर्या करावी लागायची. पण आता तुम्हाला हिमालयात जाण्याची, अन्न त्याग वा तपस्या करण्याची जरूर नाही.

ही आंतरिक स्वच्छता मिळवण्याचा आपला मार्ग कोणता आहे विचाराल तर तो म्हणजे सामूहिकता. निर्व्याजपणे जे सामूहिकतेत राहतात त्यांची स्वच्छता विनाप्रयास होत राहते. सामूहिकतेत राहणे ही तपस्या नसून एक प्रकारचा आनंद आहे असे समजा. सहजयोग सर्वांसाठी खुला आहे. म्हणून सामूहिकतेत आल्यावर हे लोक असेच आहेत, आमच्या माणसाला हा त्रास आहे असले विचार करत बसाल तर काम अवघड होईल. अशा लोकांबरोबर जो सहजपणे राहण्याची मजा मिळवतो तो सहज-तपस्याच करत असतो. सर्व काही मिळाल्यावर आता काय हवे? तुम्ही आता देव-देवतांच्या स्थितीला आला आहात हे लक्षात घ्या; तुम्ही सांगा अगर न सांगा देव-देवतांचे कार्य चालूच असते. तसे तुमचे झाले पाहिजे आणि हे मुळीच कठीण नाही. इतर कामे व व्यवहार चालू असतांनाही थोडा वेळ तुम्ही स्वतःसाठी काढला पाहिजे व रोज सकाळी व संध्याकाळी ध्यान केलेच पाहिजे. मी हे सांगते तो काही नियम असा नाही तर एक समजूतदारपणाचा विचार आहे. ज्यामुळे आपण सहजमधे स्थिरावतो. कोण रोज ध्यान करतात व कोण करत नाहीत हे मला चटकन कळते. रोज धुतलेले कपडे चटकन ओळखता येतात व धुतलेले नसले तर त्याच्यावरची घाण लगेच दिसून येते असाच हा प्रकार आहे. तसेच एखादे दिवशी स्नान नाही झाले तरी ध्यान झालेच पाहिजे. हे सर्व आपल्याच सुखासाठी, हितासाठी व सर्व मानवजातीच्या हितासाठी आहे. आपले स्वतःवर जर खरोखरच प्रेम असेल तर आपण किती गौरवशाली व महान स्थितीला आलो आहोत व किती महान कार्य करत आहोत हे तुम्हाला समजेल.

मी जे हे सर्व सांगितले त्याचे चिंतन करा, मनन करा, विचार करा, नुसते माताजींनी सांगितले आहे असे म्हणू नका. माझ्यासाठी नाही तर दुसऱ्या लोकांसाठी श्री माताजी सांगतात अशी खोटी समजूत करून घेऊ नका. मी कशी प्रगती करेन याचे सतत भान राहून याचा विचार करा.

सर्वांना अनंत आशीर्वाद.

आपण लक्ष्मी सांभाळून ठेवण्याची जबाबदारी घेतली नाही तर भौतिक विश्वात खोलवर शिरणे सहजयोगाला अवघड जाईल कारण आश्रम कोण बमांधेल, आणि कार्यक्रम कोण घेईल, नेहमी सहजयोगात या त्या कारणांसाठी पैसे देण्यास सांगितले जाते आणि लोक कुर-कुर करतात. परंतु ते लोक केवळ स्थूल अथवा भौतिक स्वरूपाच्या नाटकांकडेच पाहतात. त्याचा सूक्ष्म अर्थ पहात नाहीत. तो म्हणजे लक्ष्मी विष्णू तत्त्वाकडे लक्ष द्यायचे, त्यामुळे आपल्या आईच्या कृपेने प्राप्त झालेल्या प्रकाशित आत्म्यामुळे संपूर्ण विराटाला प्रकाशित करायचे आहे. खऱ्या अर्थाने प्रकाशित करून काही झाले तरी सर्व भौतिक प्रकाशित करायला हवे, कारण आपण शुद्ध आत्मा आहोत.

– श्री माताजी २१-५-८४

"आता ज्यांना सामूहिकतेमध्ये रहाता येत नाही, ते सहज योगी नव्हते. होऊच शकत नाहीत. सामूहिकतेच्या बाहेर जाण्याचा प्रयत्न करणाऱ्यांनी हे लक्षात घ्यावे की त्यांच्यातच काहीतरी कमतरता आहे.

दुसऱ्याच्या संगतीत आनंद वाटायला हवा. दुसऱ्यांच्या बरोबर काम करणे आवडायला हवे. दुसऱ्यांच्या सौंदर्याचा, दुसऱ्यांच्या चैतन्य लहरींचा आनंद घ्यावा. पण ज्यांना असे वाटते की आपल्यासाठी वेगळे असावे, वैयक्तिक खाजगी असावे, ते अजून पूर्ण परिपक्व झाले नाहीत.

सामूहिकता, हा तुमची परीक्षा करण्याचा चांगला मार्ग आहे. आपण मोठे होतो तसे आपल्याला वेगळेपण हवे असते, वेगळ्या वस्तू लागतात. त्यात आनंद नसतो, काहीच आनंद नसतो. म्हणून स्वतःची परीक्षा करण्यास प्रत्येक सहज योग्यास उत्तम मार्ग म्हणजे "आपण किती कलेक्टिव्ह आहोत", ते पहाणे, दुसऱ्याच्या संगतीत राहणे मला किती आवडते आणि माझे स्वतःचे निराळे असावे - माझे मूल, माझा पती, माझे स्वतःचे कुटुंब, माझी स्वतःची खोली असे किती वाटते ज्या लोकांना असे वाटते ते अजूनी पूर्ण सहजयोगी झाले नाहीत. ते अजून अपरिपक्वच आहेत आणि ज्या स्थानावर आहेत तिथे असण्यास अपात्र आहेत.

# भारतीय संस्कृती आणि सभ्यता

## प.पू. श्री माताजी निर्मला देवींचे प्रवचन (सारांश)

दिल्ली आश्रम २५ ऑगस्ट १९८६

नवरात्रीच्या शुभदिनानिमित्त आपणा सर्वांना शुभेच्छा. तुमच्या सर्वांमध्ये सहजयोगाबद्दल जे प्रेम, आदर व गौरव आहे त्याचे कौतुकच करायला हवे. उत्तर हिंदुस्थानात आपल्याकडे वंशपरंपरा चालत आलेल्या अनेक प्रथा-धारण व प्रणाली असल्या तरी आंता तो भूतकाळ झाला आहे व तीनशे वर्षांच्या गुलामगिरीतून मुक्त होऊन आपण स्वतंत्र झालो आहोत. ही एक अभिमानाची गोष्ट असली तरी त्यांत काही विध्वंसक प्रवृत्ती पण आल्या आहेत. आपल्या संस्कृतीच्या मूलभूत मूल्यांपासून आपण दूर जात आहोत; या गोष्टींवर विचार-चिंतन झाले नाही व लोक बाह्य गोष्टींकडे जास्त आकृष्ट होत गेले. उत्तर हिंदुस्थानला हा एक प्रकारचा शापच आहे. उत्तरेमध्ये आपण फिरलो तर दिसून येते की लोकांमध्ये अश्रद्धा, अनास्था, बेफिकीरपणा असे अनेक दुर्गुण इतके बळावत चालले आहेत की उत्तर प्रदेशांत सहजयोग रूजेल असे वाटत नाही. तीच गोष्ट पंजाब, बिहारमध्ये. आपण स्वतःला हिंदु वा भारतीय म्हणत असलो तरी आपल्याला आपल्याच संस्कृतीबद्दल काही ज्ञान नाही. आपल्या मुळांना आपणच विसरलो आहोत; दुसऱ्या वृक्षांची बांडगुळे आपल्यामध्ये येतात पण त्याला फळे येणार नसतात. आपल्या पुरातन संस्कृतीमधूनच, त्याची मुळे मजबूत असल्यामुळे खऱ्या जगाचा उद्धार होणार आहे. पण इथले लोक पाहिले तर ते इथल्या मातीतले नाहीत वा परक्या मातीतले नाहीत असे अर्धवट आहेत. त्यांच्यात गहनता नाही आणि याचेच मला फार आश्चर्य वाटते. या परिस्थितीबद्दल आपण विचार केला पाहिजे. आणि आपल्याच उच्च संस्कृतीपासून आपण का दूर गेलो, का सर्व काही विसरलो हे शोधून काढले पाहिजे. त्यामानाने शीख शोकांना त्यांच्या धर्माबद्दल खूप माहिती असते. हिंदूंचे तसे नाही. याचे कारण म्हणजे धर्माचे अवडंबर जेव्हा जास्त माजते तेव्हा त्या कर्मकांडांच्या शृंखला आपल्या उन्नतीच्या आड येतात आणि लोक आपल्या धर्माच्या तत्वांना, श्रद्धेला, मूलभूत विचारांना विसरतात. परदेशी लोकांना आपण म्हणू शकतो की भारतीय संस्कृति जाणून घेतली पाहिजे आणि त्याच्या मूलभूत विचारांचे अनुसरण केले पाहिजे. पण इथल्याच हिंदु लोकांना काय सांगणार? हे लोक स्वतःलाच फार मॉडर्न झालो असे समजतात, इतके ते उथळ झाले आहेत.

म्हणूनच आपली संवेदना, जी आत्म्याकडून येते, गहन होऊ शकत नाही. जो मनुष्य वरवरच्या गोष्टींमध्येच रमत असतो त्याला गहनता कशी येणार? आणखी एक गोष्ट विचार करण्यासारखी म्हणजे आपण ही संवेदना का हरवून बसलो व ती परत कशी मिळवतां येईल इकडे बघणें. कारण आपण धर्माला विसरलो आहोत. मी माणसाच्या बाह्यातल्या धर्माबद्दल बोलत नाही तर माणसाच्या अंतरंगातील धर्माबद्दल बोलत आहे, हा धर्म म्हणजेच संतुलित जीवन. त्याचा जीवनाच्या सर्व बाबतीत परिणाम होत असतो. आता कुणी म्हणेल कपडालत्याची का फिकीर करायची, ते तर बाह्यातले जड आहेत. (सूक्ष्म नाहीत) पण जड नीट समजल्याशिवाय सूक्ष्म कसे लक्षांत येईल? जडाच्या बाबतीत इतका उच्छृंखलपणा ठेवला तर सूक्ष्मता कशी मिळणार? आपल्या भारतीय संस्कृतीची विशेषता लक्षात न घेतल्यामुळे लोक चुका करत राहतात. महिलांनी बांगड्या घालणे विशुद्धी चक्रासाठीच आहे. पुरुषही पूर्वी कंकण वापरत होते. अशा आपल्या संस्कृतीमधील सर्व गोष्टी विशिष्ट उद्देशाने, अर्थाने, योजनापूर्वक आखलेल्या आहेत. या गोष्टी धर्मांत सांगितल्या गेल्या नाहीत तर पूर्वीच्या ऋषी-मुनींनी, जे दृष्टे होते, सांगितल्या आहेत. म्हणून आपण प्रत्येक गोष्टीत, आचार-विचारांत, बोलण्या-वागण्यांत प्रथम भारतीय आहोत याचे भान ठेवले पाहिजे. जोपर्यंत ही भावना रूजत नाही तोपर्यंत सहजयोगांत तुम्ही स्थिरावणार नाही. परकीय सहजयोगी आपण प्रत्येक बाबतीमध्ये भारतीय संस्कृतीप्रमाणे कसे होऊ याबद्दल जागरूक असतात. मला कुणी म्हणाले की पाश्चात्य सहजयोग्यांचे समर्पण व आस्था इकडच्या सहजयोग्यांत दिसत नाही. इकडचे लोक आजार बरे करण्याच्या मागे असतात. परकीय लोकांची बुद्धी कुशाग्र व चमकदार असल्यामुळे त्यांना लवकर समजून येते की आजपर्यंत अहंकारामधून ते जे काही करत होते ते सोडून दिले पाहिजे व भारतीय संस्कृती, जी आत्मनिर्देशक आहे, पत्करली पाहिजे. ही गोष्ट त्यांनी मानल्यामुळे ते तसेच वागतात. त्या गोष्टी आचरणांत आणतात. आपल्या लोकांचे तसे नाही; माताजींच्या समोर नीट वागतील पण एरवी त्याची आठवणही ठेवणार नाहीत.

आज मी आपल्यासमोर एकच प्रस्ताव मांडत आहे. आपल्याला माहीत आहेच की विश्व-निर्मल-धर्माची स्थापना झाली आहे. या विश्वधर्माची संस्कृती पूर्णपणे भारतीय आहे. त्याबद्दल कसलीही शंका घ्यायची जागा नाही. भारतात जे येतील त्यांना भारतीय संस्कृतीचेच पालन करावे लागणार. कारण ही संस्कृती हजारो वर्षांपासून, विचार व परिक्षण करून त्यातले दोष दूर करून करून बनलेली आहे. चित्तनिरोध करणे हे त्याचे मुख्य अंग आहे. दिल्लीमध्ये बघितलेत तर सगळ्यांच्या नजरा भरकटत असतात. कुणाचीही नजर शुद्ध दिसत नाही, त्यामध्ये वासना, हाव, लोभच दिसतात. चित्तनिरोध होण्यासाठी आपण आपल्या स्वतःचा व इतरांचाही आदर ठेऊन एक सौष्ठवपूर्ण व्यक्तिसारखे झाले पाहिजे, आपाल्या जीवनाचे सर्व व्यवहार शुद्ध व सौष्ठवपूर्ण असले पाहिजेत. प्रत्येक स्त्री-पुरूषाचे जीवन, आचार व व्यवहार तसे दिसले पाहिजेत. पण आपण लोक पाश्चात्यांच्या वाईट गोष्टी पटकन उचलतो तर त्यांच्या चांगल्या गोष्टींचा स्वीकार करत नाही, आणि वर स्वतःलाही मॉडर्न समजतो. असल्या आधुनिकतेच्या शापातून तुम्ही वाचू शकणार नाही.

आपल्या मुलांच्या बाबतीतही तुम्ही जागरूक राहून त्यांना भारतीय संस्कृतीप्रमाणे बनवले पाहिजे. मुलांमध्ये आदर, नम्रता, आस्था इ. गुण असले पाहिजेत. महाराष्ट्रीय मुले अशी असतात. त्यांना इकडे-तिकडे बघण्याची, बडबड करण्याची सवय नसते. उलट इंग्रज लोकांची मुले फार दांडगाई करतात म्हणून आयांना त्यांना घेऊन बाहेर बसावे लागते.

या गहनतेसाठी आपणच आपले आत्मपरीक्षण करून आपल्याला गहनता न मिळण्याची कारणे शोधून काढली पाहिजेत; त्यांच्याबाबतीत सतर्क बनले पाहिजे. भारतीय संस्कृतीचे आदरपूर्वक समर्थन व आचरण केले पाहिजे. वृद्ध मंडळींचा, नातेवाईकांचा आदर राखला पाहिजे. काही सहजयोगी आपण ज्या माता-पित्यांचा आदर राखीत नाही असे मला समजले. एखादी आई भुताटकीसारखी असली तर हे चालण्यासारखे आहे; पण एरवी मातेला त्रास देणे सहजयोगाला मान्य नाही आईवडिलांचा अनादर करणे मुळीच मान्य नाही. तसेच भाऊ-बहिणींना सोडून देणे पण चालत नाही. त्याचप्रमाणे घरी आलेल्या व्यक्तीचा आदर ठेऊन त्याचे स्वागत केले पाहिजे.

आजपर्यंत आपण जे हरवून बसलो आहोत ते सर्व सहजयोगांतून तुम्हाला परत मिळवायचे आहे. पन्नादाईसारख्या सामान्य स्त्रीने राजपुत्राला वाचवण्यासाठी आपल्या मुलाचा बळी दिला. तशीच महाराणी पद्मिनी जिने जोहार केला. यासारखी अनेक उदाहरणे आहेत. त्यांचे स्मरण ठेवा. अशा या महान संस्कृतीला सोडून तुम्ही सहजयोगात काहीही मिळवू शकणार नाही. मी अनेक देशात हिंडून तेथील संस्कृती पाहिली आहे. इजिप्त, चीन, इटली इ. देशांतील अगदी पुरातन काळापासून चालत आलेली संस्कृति पण पाहिली आहे; ज्यांच्यामध्ये बऱ्याच विकृती आल्या आहेत. आपल्याकडच्या देवदेवतांबद्दलही त्यांच्याकडे विपरीत कल्पना झाल्या आहेत. संस्कृतीमध्ये सभ्यता यायला हवी. सभ्यता फार महत्वाची गोष्ट आहे. आणि तीच गोष्ट सोडून आपण कृत्रिम सभ्यतेच्या आहारी गेलो आहोत. म्हणून आपण भारतीय संस्कृतीचा अभिमान बाळगला पाहिजे, तिचा आदर केला पाहिजे, आणि आपल्या संपूर्ण जीवनामध्ये तिचे दर्शन होईल असा प्रयत्न केला पाहिजे. परदेशी वस्तू वापरणे, त्यांच्या रहाण्या-वागण्याची पद्धती अनुसरणे चुकीचे आहे. तुमची आई सर्व भारतीय वस्तू, प्रसाधने वापरते तुम्हाला माहित आहेच. उत्तर हिंदुस्थानामध्ये परदेशी वस्तू वापरणे, परदेशी आचार-विचारांची नक्कल करणे इकडे लोकांचा फार कल असतो. पण ते कुठपर्यंत जाणार आहेत? म्हणून आपली सभ्यता राखली पाहिजे.

आता धर्माचा प्रश्न. धर्म म्हणजे संतुलन. जरूरीपेक्षा जास्त बोलणे, जरूरीपेक्षा जास्त टीका करणे किंवा कुणाच्या आहारी जाणे चुकीचे आहे. सर्वांत दुःखाची गोष्ट म्हणजे आपल्याकडे, विशेषतः उत्तर भारतामध्ये महिलांना फार दबावाखाली ठेवले जाते; त्यांचा खूप छळ होतो. पण आता त्या शहाण्या झाल्या आहेत, उलट बोलून जबाब विचारत आहेत. ही नैसर्गिक प्रक्रिया आहे; साधे-सरळपणाने वागल्याने आपला टिकाव लागणार नाही हे त्यांना समजले आहे. असे सांगतात की मुलसलमान देशांमधून हे प्रकार आले पण मी मुसलमान देशांतही गेली आहे, तिकडे स्त्रीला फार मानाने वागवतात. आपल्याकडे ना हिंदु ना मुसलमान असे वाटावे इतका महिलांना त्रास भोगावा लागतो. नवविवाहितेला जाळून ठार करण्याचे प्रकार तर भयानकच, परेशातही त्याबद्दल लोक मला विचारतात. कायदेकानु करत रहातात, पण माणसाला स्वतः कायदेशीरपणे रहाताच येणार नाही का? स्त्री म्हणून तिची इज्जत आपणच संभाळायला हवी. इतकेच नव्हे तर स्त्रीवर ओरडून रागावणे हेही एक पाप आहे. तो काय पुरुषांचाच अधिकार आहे का? पत्नी ही तुमच्या मुलांची आई आहे. पण स्त्रियांनीही चारित्र्यवान असले पाहिजे; तिने स्वतःला पूजनीय ठेवले पाहिजे. पंडितांबरोबर भरसभेत वादविवाद करणाऱ्या महिला या देशांत होत्या. इतकी ही महान संस्कृति आहे. पण आता त्यांचा विसर पडला. एखादी राक्षसी प्रवृत्ती स्त्री आली तर तिच्यासमोर तुम्ही मान वाकवाल, किंवा

चारित्र्यहीन असलेल्या स्त्रीबरोबरही तुम्ही धावाल, हा पुरुषार्थ म्हणायचा का?

आता बायकांची तऱ्हा पहा. त्यासुद्धा उथळ वाटतात. फॅशनच्या नावाखाली वाटेल ते कपडे घालायचे, असभ्य रीतीने हिंडणे-फिरणे व बडबड करत राहणे म्हणजे पुरुषांची नजर खेचण्याचेच प्रकार. इतक्या त्या उच्छृंखल झाल्या आहेत. कारण इतक्या वर्षांच्या दबावाखाली राहिल्याने त्या कसेही करून पुरुषांना खुष करायला बघतात. मी या सर्वांबद्दल पुरुषांनाच दोष देते. कारण स्त्रीत्वाचा सन्मान केल्यानेच तिचा गौरव होत असतो. याचा अर्थ असा नाही की बायकांनी उठापळ बोलत रहावे, तिने सन्मानपूर्वक नवऱ्याबरोबरीनेच रहावे; त्याच्या इच्छा जाणून पुऱ्या कराव्या. स्त्रीमध्ये फार मोठी शक्ती आहे. ती पुरुषाला उद्युक्त करू शकते, उभारी देऊ शकते. पण सारखेच जर जमीन धोपटत रहाल तर एक दिवस त्यांतूनच ज्वालामुखी भडकेल. महाराष्ट्रात त्यामानाने बरे आहे, तिकडे हुंडापद्धत नाही. दक्षिणेकडे मात्र हुंडा फार घेतात. म्हणूनच सारे मद्रासी दिल्लीकडे आले असावेत.

भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रीला फार महान समजले जाते. म्हणूनच राधा-कृष्ण असे म्हणतात. कारण राधेशिवाय कृष्ण काहीच नाही. तिच्या शक्तीमुळेच कृष्ण कंसाला ठार करू शकले. आपल्या संस्कृतीमध्ये इतक्या सुंदर-सुंदर पद्धती आहेत की सूक्ष्मपणे त्यांचा विचार केला की त्यांचे महत्त्व पटते. भारतीय संस्कृतीबद्दल लिहिणाऱ्या लोकांनी त्यातील दोषांबद्दलच लिहिले, त्याची महानता त्यांनी लक्षात घेतली नाही. एखाद-दुसरा दोष त्यामध्ये आला असेल पण म्हणून तिची महानता कमी होत नाही. आता 'स्वार्थ' हा शब्दच पहा; 'स्व'चा अर्थ जाणणे म्हणजे स्वार्थ, परमस्वार्थ हाच जो तुम्हाला परमात्म्याची भेट (योग) करवतो. मी पाहते की परदेशी महिला भारतीय स्त्रियांप्रमाणे कपडेलत्ते करण्यात, त्यांच्यासारखे राहण्या-वागण्यांत फार रूचि घेतात. त्यांची त्या फार इज्जत बाळगतात. फार वर्षांपूर्वी मी जपानला गेले होते तेव्हा सगळीकडे मानसन्मान केले गेले. समुद्रकिनाऱ्याजवळच्या एका ठिकाणी गेले तर हजारो लोक तिथे जमलेले. चौकशी करतां कळले की एक परिपूर्ण भारतीय स्त्री कशी असते, ते पहायला ते आले होते. इतकी त्यांची तळमळ; वर जिथे जिथे आम्ही गेलो तिथे तिथे उपहार म्हणून भेट-वस्तू दिलया. माझे केस पाहून तर ते म्हणाले आमच्या रॉयल फॅमिलीतल्या महिला फक्त असे केस ठेवतात व बाकी साऱ्या पार्लरमध्ये जातात.

आपल्या देशातच राहिल्यामुळे आपल्याकडे जे सुंदर, सभ्य आहे ते आपल्या लक्षात येत नाही. बाहेर पडल्यावरच त्याची महति कळते. विवाहित स्त्रियांनी अलंकार घातले पाहिजेत. स्वतःचे घर सुंदर, सुशोभित ठेवले पाहिजे. योग्य दिसेल असाच पेहराव केला पाहिजे. नुसते आकर्षक दिसण्यासाठी नटायचे हे भारतीय संस्कृतीनुसार नाही. ज्या समारंभासाठी आपण जातो त्याची शोभा वाढेल असा पेहराव स्त्रियांनी करवा, स्वतःच्या प्रदर्शनाची अशावेळी हौस ठेऊ नये. महाराष्ट्रात माझ्या पूजेला येतात किंवा मला एअर-पोर्टवर भेटायला येतात तेव्हा तेथील महिला अगदी नटूनथटून येतात. देवीला भेटायचे तर सुंदर दिसायला हवेच असे त्या समजतात. महाराष्ट्रांतील महिला आता दिल्लीकरांची बरोबरी करायला लागल्या आहेत.

मला मनापासून वाटते की भारतीय संस्कृतीमधील अगदी बारीक-बारीक गोष्टी तुम्हाला समजावून सांगाव्या. तुम्ही या संस्कृतीची पूर्ण माहिती करून घ्या. देवीमहात्म्य वाचा, देवीच्या सर्व गुणांबद्दलही जाणून घ्या म्हणजे खऱ्या अर्थाने तुम्ही स्त्रिया गृहलक्ष्मीच बनून जाल.

उत्तर हिंदुस्थानात पत्नीला मुळीच मान देत नाहीत पण मुलींना खूप चांगले वागवतात या गोष्टीचे मला नवल वाटते. ही अगदी मुसलमानी पद्धत आहे. मुलगी लग्न झाल्यावर सासरी जाईल पण पत्नी आयुष्यभर तुमच्याबरोबर असणार आहे. त्याचप्रमाणे नवऱ्याला मान द्यायचा नाही पण मुलाचे कोडकौतुक करायचे हाही एक विचित्र प्रकार मुलगा झाला नाही तर सगळे खलास; झाला आणि मोठा होऊन आईला मार देऊन लागला तरी हरकत नाही. स्त्रीला सुरूवातीपासूनच अशी तिच वागणूक मिळत गेली तर तिच्यामध्ये असुरक्षितपणाची भावना घर करून बसते; अशी स्त्री तुम्हाला स्वस्थ बसू देणार नाही किंवा तुमचा सर्वनाश करेल. मुलांनासुद्धा आयांनी नीट वळण लावून सहजयोगाला योग्य असे चालणे-बोलणे-वागणे शिकवले तर त्यांची खूप उन्नती होईल. पण असे दिसत नाही. एक तर मुलांना सारखं रागावून धाकात ठेवले जाते किंवा फाजील लाड केले जातात. मुलांना इज्जत दिली पाहिजे. एवढंच नव्हे तर घरच्या नोकरांनाही इज्जतीने कुटुंबातला माणूस असल्यासारखी वागणूक दिली पाहिजे. बायकांनी सारखे हे मला आवडत नाही, हा पसारा काय केलाय, हे ठीक झाले नाही. इ. बडबड करू नये. घर स्वच्छ ठेवायची, स्वयंपाक करायची त्यांना आवड असली पाहिजे. दुसऱ्यांसाठी सारखे कष्ट करायची शक्ती हवी. याचा अर्थ असा नाही की पुरुषांनी काहीच न करता लोळत पडायचे. इंग्लंडमध्ये भांडी घासण्याचे काम पुरुष करतात. पुरुषांना आपण पुरुष आहोत याचा अहंकार फार असतो. पुरुष आणि स्त्री असा फरक मला तर दिसतच नाही. करनेवाला तोच आहे व भोगनेवाला तोच आहे. आपण स्वतःला पुरुष समजतो हा एक फार मोठा अहंकार आहे. आपण तर सर्व आईची लेकरे आहोत.

सहजयोग्यांतही हा अहंकार असतो. शहाणपणाची गोष्ट समजून घ्यायला हवी ती म्हणजे पुरुष आणि स्त्री (पती-पत्नी) एकाच रथाची दोन चाके आहेत आणि एक चाक लहान झाले तर रथ चालत नाही. उलट चाकच फिरत राहते. उजव्या बाजूच्या चाकाचे (पती) काम बाहेरचे सर्व सांभाळणे, बाहेरची कामे करणे, बाहेरची स्वच्छता करणे. इंग्लंडमध्ये सर्व पुरुष शनिवार-रविवारी आपल्या घराबाहेरची जागा झाडून स्वच्छ करतात. आपल्याकडे पूर्वीच्या काळी बाहेरची सफाई पुरुषच करत असत. घरांतील स्त्रियांच्या कामाला हातभार लावला तरच त्यांचे काम किती कष्टाचे असते हे समजते.

आपल्या स्वत:बद्दल कोणत्याही प्रकारची विशिष्ट धारणा बाळगणे हे चांगले नाही. आमच्याकडच्या काही मुली सांगतात की आमची लग्ने बाहेरच्याच मुलांबरोबर होऊ देत. कारण त्या म्हणतात की सहजयोगिनी झाल्यावर आम्हाला वेंडुक्यांचा मार नकोसा वाटतो. पाश्चिमात्य मुलींना तऱ्हेतऱ्हेने पटवून देऊन भारीय लोकांबरोबर लग्नाला तयार करावे लागते. पण लग्नानंतर इकडची मुलेच परदेशांत जातात. ज्यांना असे परदेशांत जायचे आहे त्यांनी म्हणूनच घरांतली सारी कामे करणाऱ्याचे शिकून घ्या. नाहीतर तुम्हाला तिकडे कुणी विचारणार नाही.

आनंदाचा स्त्रोत आत्मा आहे, तो आपण मिळवला आहे. म्हणून आता तो आनंद आपल्या नसानसांमधून प्रवाहीत झाला पाहिजे. आपल्या जीवनात, व्यवहारांत तो उठून दिसला पाहिजे. त्यासाठी आपली दानत विकसित झाली पाहिजे. जो देऊ शकत नाही तो या आनंदाची मजा लुटत नाही. हे सर्व प्रवाही झालेच पाहिजे तर त्याचा उपयोग. नाहीतर डबक्यांत राहणाऱ्या बेडकाची अवस्था होईल. जीवनाचा रस मिळवायचा असेल, आत्म्याचा अनुभव व आनंद मिळवायचा असेल तर जरूरी आहे की आपले हृदय उघडून त्या आनंदाच्या प्रवाहात सामील झाले पाहिजे. तुमची आई इतके वय झाले असले तरी किती मेहनत करते, दर तिसऱ्या दिवशी प्रवास करते, लाखो लोकांची कुन्डलिनी जागृत करते तुम्ही जाणता यात फक्त देण्याची शक्ती आहे. तुम्ही जास्त देत राहिलात की वृद्धत्व येणारच नाही. सूक्ष्मामध्ये हृदय उघडले गेले पाहिजे हेच आपल्या संस्कृतीच्या सभ्यतेचे तत्व आहे. आणि त्याचेच तुम्हाला आचरण करायचे आहे.

या संस्कृतीचे गुणगान जितके करावे तितके थोडे आहे. पण ती आपल्या अंतरंगात खोलवर रुजली पाहिजे. तिला सोडू नकाच तर तिचा प्रसार करा. आपले संगीत, आपली कला इ. सर्व फार गहन आहे. ते सर्व जाणून घ्या, त्याच्या सूक्ष्म तत्त्वांमध्ये उतरा. हे आपल्या भारतमातेचे सौंदर्य आहे. ते लक्षात घेत नाहीत म्हणून लोक झगडे करतात. आपल्याकडच्या छोट्या-छोट्या गोष्टींमध्ये, घरगुती औषधांमध्ये मूल्य आहेत. उदा. केळे खाल्ल्यावर चणे द्या; उन्हांतून आल्यावर गूळ-पाणी द्या पण द्राक्षे खाल्ल्यावर लिमका पिणे, आइस्क्रीम खाल्ल्यावर कॉफी पिणे चूक आहे. ह्या सर्व लहान-लहान गोष्टी शरीर स्वास्थ, मन:स्वास्थ्य, चित्तशुद्धी यांच्या परिपोषणासाठी आहेत. म्हणून त्यांचा अर्थ लक्षांत घ्यायला हवा. तीच गोष्ट चारित्र्याची. चारित्र्याला उंची देणारी कोणती गोष्ट असेल तर सभ्यता. सभ्यतेमुळेच आपल्याला काय अयोग्य आहे, अशोभनीय आहे हे तुम्ही जाणता. म्हणून आज तुम्हाला एवढंच सांगणे आहे की आपली भारतीय संस्कृती जाणून घ्या व तिचा स्वीकार करा. त्यांतूनच तुमचे चारित्र्य उच्च स्थितीला येईल. श्री शिवाजी महाराजांनी कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेला मानाने परत पाठवले. तसेच राणा प्रताप. आजकाल असे चारित्र्यवान नेते कुठे दिसतात? आपल्या संस्कृतीत परस्त्री मातेसमान व परकन्या लेकी समान असे मानतात. म्हणून या महान संस्कृतीची गहनता समजून घेणे प्रत्येक सहजयोग्यांचे परम कर्तव्य आहे. तुमच्याकडूनच परदेशातील सहजयोगी ते शिकतील.

तुमच्या अहंकाराशी लढू नका. झगडण्याचा प्रयत्न केल्यास तो अधिकच तुमच्या डोक्यावर चढेल. लढण्याचा हा मार्ग नाही, की तुमच्याकडे अहंकार आहे आणि तुम्ही त्यांच्याशी लढाई करीत आहात, 'मी आता तुला ठोसा मारतो, "मग तो वाढेल अधिक ठोसे माराल तसा अधिक मोठा होईल, अहंकाराशी कधीही भांडू नका. केवळ त्याला पहाणे हाच एक मार्ग आहे.

तुमचे चित्त फार महत्त्वाचे आहे. तुमचे चित्त आता प्रकाशीत झाले आहे. ज्याच्याकडे तुम्ही पहाल ते योग्य आकाराचे होईल.

अहंकार मोठा झाल्यास, त्याच्याकडे फक्त लक्ष ठेवा; उत्तम म्हणजे, आरशामधे स्वत:ला पहा आणि विचारा "काय श्री ईगो कसे काय आहे" मग तो खाली येईल. पण त्याच्याशी भांडू नका फक्त पहायचे असते. अनेक प्रकारेची अहंकार असू शकतात. अधिक शिकलेले असाल तर तुम्ही अहंकारी होता, शिकलेले नसाल तरी अहंकार असतो. कारण आपण कोणीतरी आहोत हे दाखवायचे असते. विविध प्रकारचे अहंकार असतात.

– श्री माताजी२८-७-८५